पाक्षिक प्रदेश बीजेपी

# मनोगत

मुंबई ● वर्ष: 7 ● अंक: 6 ● 16 मार्च, 2025 ● पृष्ठसंख्या: 36 ● किंमत: 5 रू.












# समृद्ध, विकसित महाराष्ट्राचा दृढ संकल्प







अध्यक्षीय मनोगत

# भाजपा महायुती सरकारची झेप

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनात आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टी महायुतीने विधानसभा निवडणुकीत प्रचंड बहुमत मिळवले. भाजपाला विधानसभा निवडणुकीत आतापर्यंतच्या सर्वाधिक जागा आणि सर्वाधिक मते मिळाली. त्यानंतर महायुती सरकारचा पहिला अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री मा. अजित पवार यांनी मांडला. स्वातंत्र्याच्या शताब्दीपर्यंत अमृतकाळात भारताला विकसित राष्ट्र करण्याचा निर्धार मा. मोदीजींनी केला आहे. त्यांच्या व्हिजनला अनुसरून राज्याचा अर्थसंकल्प भाजपा महायुती सरकारने मांडला. त्याबद्दल मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अभिनंदन करतो. मोदीजींनी देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलिअन डॉलर्सची करून भारताला आर्थिकदृष्ट्या जगात तिसऱ्या क्रमांकावर नेण्याचे ध्येय ठेवले आहे. महाराष्ट्र हे देशाचे ग्रोथ इंजिन आहे. देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलिअन डॉलर्सची होण्यासाठी महाराष्ट्राने पुढाकार घेऊन स्वतःची अर्थव्यवस्था एक ट्रिलिअन डॉलर्सची करणे गरजेचे आहे. हे उद्दीष्ट आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात साध्य करू. भाजपा महायुती सरकारच्या अर्थसंकल्पात राज्यातील गुंतवणूक वाढवून मोठ्या प्रमाणात रोजगार आणि संपत्तीची निर्मिती करण्याची भूमिका आहे, शक्तिपीठसारख्या एक्सप्रेस महामार्गाचा विकास करून पायाभूत सुविधांच्या बाबतीत आणखी प्रगती करण्याची दृष्टी आहे. त्याचबरोबर शेतकरी, महिला, युवा, ओबीसी, दलित, आदिवासी अशा सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याची कल्याणकारी भूमिका आहे. जनतेने महायुतीला जबरदस्त आशिर्वाद दिला आहे. आता राज्याला विकासाच्या शिखरावर नेऊन वचनपूर्ती करायची आहे. त्यासाठीचा रोडमॅप या अर्थसंकल्पात स्पष्ट केला आहे. महाराष्ट्र आता थांबणार नाही. 'मनोगत'च्या या अंकात काश्मीरला मुख्य प्रवाहाशी जोडणाऱ्या हायवेबद्दल मा. केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांचा लेख आहे. घटनेच्या ३७० व्या कलमामुळे जम्मू काश्मीरमध्ये भारताचे संविधान लागू होण्यात अडथळा होता. त्या राज्याला स्वतंत्र संविधानाचा अधिकार होता. तसेच त्या राज्याच्या मुख्यमंत्र्याला पंतप्रधान म्हणण्याचा आणि भारताचा तिरंगा नव्हे तर स्वतंत्र निशाण बाळगण्याचाही अधिकार होता. त्याच्या विरोधात जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी आंदोलन केले आणि हौतात्म्य पत्करले. 'एक देश मे दो विधान, दो निशान, दो प्रधान नही चलेंगे', अशी त्यांची घोषणा होती. त्यांचे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गृहमंत्री अमित शाह यांच्या साथीने साकाराले. संविधानाचे ३७० कलम भाजपाच्या केंद्र सरकारने रद्द केल्यामुळे त्या राज्यात देशाचे संविधान पूर्णपणे लागू झाले आणि जम्मू काश्मीर ऊर्वरित देशाशी अखंडपणे जोडले गेले. आता त्या राज्याच्या विकासासाठी मोदी सरकारने ऐतिहासिक पावले उचलली आहेत. काश्मीरला जोडणारा हायवे हे त्याचे उदाहरण आहे. मोदी सरकारने गेल्या दहा वर्षांत देशाच्या अनेक दूरदूरच्या ठिकाणांना रस्तेमार्गे जोडण्याचे महत्त्वाचे काम केले आहे. यामध्ये मा. नितीनजी गडकरी यांचे मोलाचे योगदान आहे. भावनिकदृष्ट्या देशाची एकात्मता आणि अखंडता महत्त्वाची आहे. त्याचसोबत विकासाची गंगाही देशात सर्वत्र पोहचली पाहिजे. मोदीजींच्या नेतृत्वातील सरकार नेमके हेच काम करत आहे.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार
सजावट व मांडणी : गौतम आर्य
सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी
विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे
पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर
उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

समृद्ध, विकसित महाराष्ट्राचा दृढ संकल्प ........ ०४




काश्मीरला मुख्य प्रवाहाशी जोडणारा ‘हायवे’ ........ ०९




राज्यातील सिंचनाला नवा आयाम ........ १२



घुसखोरांची वकिली महागात पडेल ........ १५



महाराष्ट्रातील नंबर प्लेट्स सर्वात स्वस्त ........ १७




उज्वल भविष्याचा अर्थसंकल्प ........ २१



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# समृद्ध, विकसित महाराष्ट्राचा दृढ संकल्प

महायुती सरकारने शेती, उद्योग, पायाभूत सुविधा आणि रोजगार या चतु:सुत्रीवर आधारीत २०२५-२६ चा अर्थसंकल्प सादर केला आहे. विकसित भारताबरोबर विकसित महाराष्ट्राचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेने महायुती सरकारने या अर्थसंकल्पाद्वारे आणखी एक पाऊल टाकले आहे. राज्याचा अर्थसंकल्प आता ७ लाख कोटींवर पोहचला आहे.




**कोणत्याही** राज्याचा अर्थसंकल्प ही त्या राज्याच्या भविष्यकाळातील विकासाची नियोजनबद्ध आखणी असते. ही आखणी करताना राज्याचे उत्पन्न आणि विकासासाठीच्या योजनांवरील खर्च याचा ताळमेळ साधणे आवश्यक असते. जमाखर्चाचा मेळ घालून, राज्याच्या तिजोरीत विविध मार्गांनी भर घालून सर्वांगीण विकासाकरीता आवश्यक तरतूद करणे, या विकास योजनांची काटेकोर अंमलबजावणी होणे अशा अनेक आघाड्यांवर राज्य सरकारला लढायचे असते. उपलब्ध महसूलाचा यथायोग्य विनियोग करणे हे मोठे आव्हान असते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीच्या धोरणांमुळे आपण २०४७ पर्यंत विकसित भारत ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी निर्धाराने वाटचाल करीत आहोत. या वाटचालीत महाराष्ट्रही केंद्र सरकारच्या पावलावर पाऊल टाकत आहे, असे चित्र राज्याच्या अर्थसंकल्पातून अधोरेखित होते.

पायाभूत सुविधांचा विकास, कृषी क्षेत्राच्या प्रगतीला गती, विविध समाज घटकांना मदतीचा हात, औद्योगिक गुंतवणुकीला चालना देऊन रोजगाराच्या नव्या संधींची निर्मिती, शहरांच्या वाढत्या लोकसंख्येसाठी मेट्रोसारख्या पायाभूत सुविधांचा विस्तार अशा अनेक अंगांनी राज्याचा अर्थसंकल्प शाश्वत विकासाचे संकल्प चित्र आपल्या पुढे मांडतो. औद्योगिक विकासाला चालना देण्याबरोबर शेती क्षेत्राच्या विकासासाठी राज्य सरकार वचनबद्ध असल्याचे या अर्थसंकल्पातून प्रतीत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्य शतक महोत्सव साजरा करत असताना भारताला आर्थिक महासत्तेच्या रूपात जागतिक व्यासपीठावर विराजमान करण्याचा संकल्प सोडला आहे. मोदी सरकारचा हा संकल्प सिद्धीला नेण्यासाठी महाराष्ट्र सर्व राज्यांमध्ये अग्रेसर राहील, अशी ग्वाही या अर्थसंकल्पाने दिली आहे. कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेसाठी दुर्लक्षित समाज घटकांना सरकारी सहाय्याचा हात देणे आवश्यक मानले जाते. यासाठी गेल्या अडीच वर्षात विविध समाजांसाठी सुरू केलेल्या योजना या पुढील काळातही चालू राहणार आहेत. विकासासाठी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगत संशोधनांचा वापर करण्याची अनोखी दृष्टी अर्थसंकल्पातून व्यक्त होते. मोदी सरकारने सुरू केलेल्या 'लखपती दीदी'सारख्या योजना तळागाळात पोहचवण्याचे आव्हान राज्य सरकारने पेलले असल्याचे

# राज्य अर्थसंकल्पाची वैशिष्ट्ये

● मुंबई महानगर क्षेत्रासह गडचिरोली होणार विकासाचे केंद्र



● महाराष्ट्राचा उद्योग विकास नवा आयाम गाठणार!



● महाराष्ट्राच्या प्रगतीला नव्या उंचीवर नेणारा मेट्रोचा विस्तार!



● ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे विस्तारणार

● महाराष्ट्राच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारशाचा नवा अध्याय!



● सागरी सेतू आणि उन्नत मार्गाद्वारे वाढणार प्रवासाची गती




● 'सर्वांसाठी घरे'चे उद्दिष्ट लवकरच होणार साध्य



● शेतीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर होणार!



● हरित ऊर्जेमुळे वीज खरेदी खर्चात होणार बचत



● जलसिंचन प्रकल्पांतून महाराष्ट्राची जलसमृद्धी!



● रस्त्यांच्यामार्गे प्रत्येक गाव विकासाला जोडणार, सर्वांगाने महाराष्ट्राचा संतुलित विकास घडवणार!

● मराठीचा अभिमान, अभिजाततेचा सन्मान!

● ग्रो-लॉजिस्टिक हबद्वारे शेतकऱ्यांना होणार लाभ

● विकसित महाराष्ट्राच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी १०० दिवसांचा कृती आराखडा...



● विमानतळ विकासातून राज्याच्या प्रगतीचे उड्डाण!



● महाराष्ट्राच्या प्रगतीला नव्या उंचीवर नेणारा मेट्रोचा विस्तार!

● पायाभूत सुविधांचा होणार वेगवान विकास

● नव्या योजना आणि विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात विकास होणार..!



● लाडकी बहिण योजनेसाठी भरीव निधी

● शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळणार!

● आरोग्य, सामाजिक क्षेत्रासाठी विशेष निधी व योजना

● मराठ्यांच्या इतिहासाला मिळणार झळाळी...

● वीजनिर्मिती प्रकल्पांसह शेतकऱ्यांना मोफत वीज

● जलसिंचन प्रकल्पांतून महाराष्ट्राची जलसमृद्धी!

● महापुरुषांच्या भव्य स्मारकांची उभारणी

● डिझेल बसचे रुपांतर सीएनजी आणि एलएनजीमध्ये

# अर्थसंकल्पातील ठळक मुद्दे

● महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण २०२५ लवकरच जाहीर करण्यात येणार, त्यानुसार ५ वर्षाच्या कालावधीत ४० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक व ५० लाख रोजगार निर्मिती.

● गडचिरोली जिल्हा स्टील हब म्हणून उदयास येणार, गडचिरोली जिल्ह्यातील खनिकर्म महामार्गांचे जाळे विकसित करण्याकरिता पहिल्या टप्प्यात सुमारे ५०० कोटी रुपये.

● सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत ६ हजार ४०० कोटी रुपये प्रोत्साहन अनुदान.

● ऊर्जा क्षेत्रातील नियोजन व कमी दराच्या हरित ऊर्जेच्या खरेदीमुळे येत्या पाच वर्षात वीज खरेदी खर्चामध्ये १ लाख १३ हजार कोटी रुपयांची बचत.

● राज्यात महाराष्ट्र टेक्निकल टेक्सटाईल मिशनची स्थापना.

● नागपूर येथे अर्बन हाट केंद्रांची स्थापना.

● नवी मुंबई येथे २५० एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर–इनोव्हेशन सिटी.

● पालघर जिल्ह्यात वाढवण बंदराच्या विकासात राज्य शासनाचा २६ टक्के सहभाग.

● वाढवण बंदराजवळ मुंबईसाठी तिसरे विमानतळ, वाढवण बंदराजवळ मुंबई–अहमदाबाद बुलेट ट्रेनचे स्थानक, हे बंदर समृध्दी महामार्गालाही जोडणार.

● काशिद– जिल्हा रायगड येथील तरंगत्या जेट्टीचे काम लवकरच सुरु होणार.

● गेटवे ऑफ इंडिया, मुंबई येथून मांडवा, एलिफंटापर्यंत प्रवासाकरिता बोटींसाठी आर्थिक प्रोत्साहन धोरण.

● महाराष्ट्रातील किनारी जिल्ह्यांमध्ये ८ हजार ४०० कोटी रुपये किंमतीचा बाह्यसहाय्यित शोअर प्रकल्प.

● महाराष्ट्र शाश्वत पर्यावरणपूरक किनारा संरक्षण व व्यवस्थापन या ४५० कोटी रुपये किंमतीच्या प्रकल्पांतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवबाग येथे १५८ कोटी रुपये किंमतीच्या कामांना मान्यता.

● अमृतकाल राज्य रस्ते विकास आराखडा २०२५ ते २०४७ तयार करणार.

● आशियाई विकास बँक प्रकल्प, टप्पा–३ अंतर्गत ७५५ किलोमीटर रस्ते लांबीची ६ हजार ५८९ कोटी रुपये किंमतीची २३ कामे हाती घेणार.

● सुधारित हायब्रीड न्युईटी योजनेअंतर्गत ३६ हजार ९६४ कोटी रुपये किंमतीची ६ हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची सिमेंट काँक्रीटीकरणाची कामे.

● प्रधानमंत्री ग्रामसडक योजना टप्पा–३, सन २०२५–२६ साठी १५०० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे उद्दीष्ट.

● मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा–३, एक हजारापेक्षा जास्त लोकसंख्येच्या ३,५८२ गावांना १४ हजार किलोमीटर लांबीच्या सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याने प्रमुख जिल्हा मार्गांना, राज्य महामार्ग किंवा राष्ट्रीय महामार्गांना जोडणार–प्रकल्प किंमत ३० हजार १०० कोटी रूपये.

● हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गालगत ॲग्रो–लॉजिस्टिक हब विकसित करणार, प्रामुख्याने विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना लाभ होणार.

● महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्गाच्या ८६ हजार ३०० कोटी रुपये किंमतीच्या ७६० किलोमीटर लांबीच्या प्रकल्पाची भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर.

● ठाणे ते नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ उन्नत मार्ग उभारणार.

● स्वातंत्र्यवीर सावरकर सागरी सेतू–वांद्रे ते वर्सोवा–१४ किलोमीटर लांबीचे,१८ हजार १२० कोटी रुपये खर्चाचे काम मे,२०२८ पर्यंत पूर्ण करणार.

● उत्तन ते विरार सागरी सेतू व जोडरस्त्यांचा ५५ किलोमीटर लांबीचा ८७ हजार ४२७ कोटी रुपये किंमतीचा प्रकल्प हाती घेणार.

● पुणे ते शिरुर या ५४ किलोमीटर लांबीच्या ७ हजार ५१५ कोटी रुपये किंमतीच्या उन्नत मार्गाचे बांधकाम हाती घेणार.

● तळेगाव ते चाकण या २५ किलोमीटर लांबीत चार पदरी उन्नत मार्ग– ६ हजार ४९९ कोटी रुपये खर्च अपेक्षित.

### ४० लाख कोटींची गुंतवणूक येणार



● विकसित भारत– विकसित महाराष्ट्र ही संकल्पना साध्य करण्याकरीता मेक इन महाराष्ट्रद्वारे गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण आखण्यात येणार आहे. पुढील पाच वर्षाच्या कालावधीत ४० लाख कोटी रु. ची गुंतवणूक व ५० लाख रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

● राज्य सरकारने शेतकऱ्यांना विविध योजना, कार्यक्रमांच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य दिल्यामुळे सन २०२४–२५ मध्ये कृषी क्षेत्राचा विकास दर ८.७% पर्यंत सुधारला. या विकास दरात सातत्याने वाढ करण्याकरीता शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेती उत्पादनात मूल्यवर्धन, सिंचन सुविधा, वीजेची गरज भागविण्यासाठी सौर ऊर्जा इत्यादी पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येतील.

● वस्तु व सेवा करातून राज्यास होणाऱ्या उत्पन्नात दरवर्षी सुमारे १२ ते १४ टक्के एवढी वाढ होत आहे.

● सर्वांसाठी घरे हे उद्दीष्ट येत्या ५ वर्षात साध्य करण्यासाठी राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. ग्रामीण घरकुलांसाठी १५ हजार कोटी तर शहरी आवास योजनांसाठी ८ हजार १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

● राज्याच्या वार्षिक योजनेत ६२ हजार ५६० कोटीची म्हणजेच सुमारे ३३ टक्के इतकी भरीव वाढ करण्यात आली असून अनुसूचित जाती घटक योजनेच्या तरतुदीत ४२ टक्के, आदिवासी घटक योजनेच्या तरतुदीत ४० टक्के वाढ करण्यात आली आहे.

● थेट लाभार्थी हस्तांतरण (डीबीटी) सर्व वैयक्तिक लाभार्थी योजनांची अंमलबजावणी गतिमान, कार्यक्षम आणि पारदर्शक करण्यासाठी डीबीटी पद्धत राबविण्यात येत आहे. १ एप्रिल २०२५ पासून अशा वैयक्तिक लाभार्थी योजनांचा लाभ केवळ डीबीटीद्वारे देण्यात येईल.

● राज्यातील पायाभूत सुविधांमध्ये रस्ते विकास हा महत्त्वाचा विषय आहे. आपल्या अर्थसंकल्पात रस्त्यांचा विकास हा पुढील वीस वर्षांचा विचार करून, नियोजनबद्धरित्या करण्यावर भर दिला गेला आहे. यामुळे रस्त्यांचा आराखडा गाव पातळीपासून राज्य पातळीपर्यंत एक समान पद्धतीने होणार आहे. वर्ल्ड बँक, एशियन बँक, न्यू डेव्हलपमेंट बँक आणि नाबार्डच्या माध्यमातून रस्त्याचे जाळे उभारले जात आहे. यामुळे आपल्या राज्यात बंदरे, विमानतळांच्या विकासासाठीही मोठी गुंतवणूक येणार आहे.

### घरबांधणीत महाराष्ट्रच अग्रेसर




महाराष्ट्राने घर बांधणीच्या क्षेत्रात मोठी मजल गाठली आहे. या क्षेत्रातही मोठी गुंतवणूक आली आहे. विशेषतः प्रधानमंत्री आवास योजनेतून आता वीस लाख घरांचा टप्पा गाठत आहोत. यातही केंद्र आणि राज्य यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधीचा ओघ राहणार आहे. यातील घरांना 'प्रधानमंत्री सूर्यघर योजने'तून विजेसाठी स्वयंपूर्ण केले जाणार आहे. शिवाय ज्या घरांचा वीज वापर तीनशे युनीटहून कमी असेल त्यांनाही या योजनेतून वीज देण्याचे सूतोवाच अर्थसंकल्पात केली गेली आहे.

### शेती, सिंचन क्षेत्रालाही प्राधान्य



अर्थसंकल्पात कृत्रिम बुद्धिमत्ता–एआय आणि बायोटेक, ड्रोन टेक्नॉलॉजीसारख्या उत्पादन खर्च कमी करणाऱ्या आणि शेतीतील नफा वाढवणाऱ्या गोष्टींवर भर देण्यात आला आहे. 'एआय' द्वारे माती परिक्षण ते फूल–फलधारणा यापर्यंतच्या टप्प्यांचे नियोजन करता येणे शक्य आहे. त्याबाबतचे नियोजनही केले गेले आहे. जलयुक्त शिवार टप्पा दोन आणि नदीजोड प्रकल्पासाठी भरीव तरतूद केली गेली आहे.

### सामाजिक न्याय, आदिवासींचाही विकास



सामाजिक न्याय, आदिवासी विभागांच्या तरतुदीत भरीव वाढ करण्यात आली असून ती प्रत्येकी ४३ व ४० टक्के एवढी आहे. त्यामुळे सामाजिक न्यायाच्या धोरणाला बळ मिळेल, यात वैयक्तिक लाभाच्या योजना राबवल्या जाणार असल्यामुळे अनेक कुटुंबांना शिक्षण, आरोग्य आणि रोजगार यासंदर्भातील लाभ निश्चितच होतील.

### लाडक्या बहिणी ते लखपती दीदी

लाडक्या बहिणींसाठी निधी कमी पडणार नाही असे नियोजन केले गेले आहे. याशिवाय या योजनेतून बहिणी

आर्थिक स्वावलंबी व्हाव्यात असे नियोजन आहे. काही बहिणींनी या पंधराशे रुपयांतून सोसायटी स्थापन केल्या. या सोसायट्यांचे जाळे निर्माण करून, राज्यस्तरीय अपेक्स अशी सोसायटी स्थापन केली जाईल.

याशिवाय 'लखपती दीदी' या स्वयंरोजगाराच्या संकल्पनेलाही पुढे न्यायचे आहे. आतापर्यंत २३ लाख लखपती दीदींचे उदिष्ट पूर्ण केले आहे. आणखी २४ लाखांचे उद्दिष्ट साध्य करून एक कोटी लखपती दीदींचे लक्ष्य गाठायचे आहे.


---

मागील अडीच वर्षात वारंवार दिसले. या अर्थसंकल्पात राजकोषीय तूट २.७ टक्क्यांपर्यंत ठेवण्यात राज्य सरकारला यश आले आहे. मागील वर्षात ही तूट २.९ टक्के होती. महसुली जमा आणि महसुली खर्च यांचा मेळ घालणे कोणत्याही सरकारच्या दृष्टीने आव्हानात्मक असते. महायुती सरकारने हा मेळ घातला आहे. जीएसटी कर संकलनात महाराष्ट्र आघाडीवर आहे. राष्ट्रीय कर संकलनाशी तुलना केली तर आपले संकलन ७ टक्क्याहून अधिक (दीड लाख कोटीपेक्षा जास्त) आहे. त्यामुळेच भविष्यकाळात महाराष्ट्र अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रात अग्रेसर राहील, याची खात्री या संतुलित अर्थसंकल्पाने दिली आहे. शहरी भागात विविध पायाभूत सुविधा प्राधान्याने उपलब्ध केल्या जातात. त्यामानाने ग्रामीण, दुर्गम भाग रस्त्यासारख्या प्राथमिक सुविधांअभावीही वंचित राहतो. फडणवीस सरकारने ग्रामीण भागातील पायाभूत विकास क्षेत्रातील असमतोल दूर करण्यासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजना (३) अंतर्गत १ हजार लोकसंख्या असलेली राज्यातील ३ हजार ५८२ गावे सिमेंट काँक्रिटच्या रस्त्याने राज्य आणि राष्ट्रीय महामार्गांशी जोडण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यातून सुमारे १४ हजार किलोमीटर लांबीचे रस्ते बांधले जाणार आहेत. हा निर्णय अनेक अर्थांनी ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाला सर्वार्थाने चालना देणारा ठरणार आहे.

या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रात 'एआय'चा वापर करण्यासाठीची योजना सुरू करण्याची घोषणा करण्यात आली आहे. शेती क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून शेतीमालाचे उत्पादन वाढण्याबरोबरच शेतीमालाला योग्य बाजारपेठ मिळवून देण्यासाठी ही पावले टाकता येतील. माहिती जनसंपर्क क्षेत्रातील नवनव्या बदलांचा वेध घेऊन त्याचा वापर सामान्य माणसाच्या विकासासाठी करण्याची दूरदृष्टी या सरकारने दाखविली आहे. याखेरीज समृद्धी महामार्गालगत 'ॲग्रोलॉजिस्टक हब' विकसित करण्याच्या निर्णयामुळे विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. याखेरीज मराठवाड्याच्या औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी शक्तीपीठ महामार्ग अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या अर्थसंकल्पातील आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणजे मुंबई महानगर परिसर (एमएमआर) आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'ग्रोथ हब' म्हणून विकसित करण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. त्यानुसार वांद्रे-कुर्ला संकुल, कुर्ला-वरळी, वडाळा, गोरेगाव, नवी मुंबई, खारघर, विरार-बोईसर अशा सात ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाची व्यापार केंद्रे निर्माण केली जातील. भविष्यातील २५ वर्षांचा विचार करून मुंबई महानगर प्रदेशाची अर्थव्यवस्था आणखी बळकट करण्यासाठी राज्य सरकारने केलेले हे नियोजन विकासाच्या समग्र दृष्टीकोनाची प्रचिती देणारे ठरले आहे. ठाणे ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उन्नत मार्ग, वाढवण बंदराजवळ मुंबईसाठी तिसरे विमानतळ, पुणे-शिरूर या ५४ किलोमीटर लांबीच्या उन्नत मार्गाचे बांधकाम अशा अनेक निर्णयातून महायुती सरकारच्या पायाभूत विकास क्षेत्राला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा दृष्टीकोन दिसून येतो. यापूर्वी १३ वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम दिवंगत शेषराव वानखेडे यांच्या नावावर होता. अर्थमंत्री पवार यांनी अकराव्यांदा अर्थसंकल्प सादर केला आहे. पुढील वाटचालीत ते देखील हा विक्रम पूर्ण करत अर्थसंकल्प सादर करतील, असा विश्वास आहे.

मोदी सरकारने गेल्या ११ वर्षात संपूर्ण देशभर द्रुतगती महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग, विमानतळ, उड्डाणपूल या माध्यमातून अनेक धडाकेबाज प्रकल्प हाती घेतले आहेत. यापैकी अनेक प्रकल्प पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. फडणवीस सरकारने २०१४ ते २०१९ या काळात मुंबई, पुणे आणि नागपूर या शहरांमधील मेट्रो सेवा सुरू केली. या पुढील काळात या मोठ्या शहरांमधील मेट्रो सेवांचा आणखी विस्तार होणार आहे. येत्या काही वर्षात पायाभूत सुविधांचे हे प्रकल्प साकार होतील आणि विकासाच्या रूपाने त्याची फळे सामान्य माणसाला मिळतील. म्हणूनच म्हणतो की, महाराष्ट्र आता थांबणार नाही, विकास आता लांबणार नाही... ■

# काश्मीरला मुख्य प्रवाहाशी जोडणारा 'हायवे'




● **नितीन गडकरी**, केंद्रीय रस्ते व वाहतूक व परिवहन मंत्री

> जम्मू आणि काश्मीरला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यावर सरकारने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. वाहतूक व्यवस्था आणि बाजारपेठांशी असलेला संपर्क सुधारून आर्थिक पुनरुज्जीवनाचा मार्ग मोकळा करण्यात येत आहे. गेल्या दशकातील ही प्रगती या भागातील पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी सरकारची कटिबद्धता दर्शवते.

**दीर्घकाळापासून** अविकसित आणि मुख्य प्रवाहापासून विलग असलेल्या प्रदेशांचा विचार केल्याशिवाय भारताची विकासगाथा पूर्ण होऊ शकत नाही. जम्मू आणि काश्मीर हा अद्वितीय नैसर्गिक सौंदर्य, समृद्ध संस्कृती आणि अफाट क्षमता असलेला प्रदेश. हा प्रदेश अनेक दशकांपासून सर्वसमावेशक विकास आणि देशाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्यासाठी प्रयत्नशील आहे. तथापि, गेल्या दशकात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात, या क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तन घडले. हे आहे, पायाभूत सुविधा आणि कनेक्टिव्हिटीच्या शक्तीमुळे घडलेले परिवर्तन!

पंतप्रधानांच्या 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' या दृष्टिकोनाच्या अनुषंगाने, आमच्या सरकारने जम्मू आणि काश्मीरला भारताच्या विकास प्रक्रियेच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठी विशेष लक्ष दिले. आधुनिक पायाभूत सुविधा आणि अखंड-सक्षम

कनेक्टिव्हिटीच्या माध्यमातूनच या प्रदेशाच्या आर्थिक क्षमतेची द्वारे खुली होतील आणि तो प्रगत होईल, अशी आमची भूमिका आहे. याच माध्यमातून जम्मू-काश्मीरच्या नागरिकांना सक्षम करता येईल आणि देशाशी असलेले या प्रदेशाचे नाते अधिक मजबूत करता येईल, हा आमचा विश्वास आहे.

बर्फाच्छादित हिमालयापासून हिरव्यागार दऱ्यांपर्यंत पसरलेल्या जम्मू-काश्मीरमध्ये पायाभूत सुविधांच्या विकासात खडतर भूगोल आणि इतर आव्हानात्मक परिस्थितींमुळे अडचणी होत्या. या अडचणींमुळे कित्येक दशके उद्योग-व्यापार, पर्यटन आणि अन्य व्यवहारांत अडथळे येत होते. तथापि, आता परिस्थिती बदलली आहे. आज जम्मू आणि काश्मीरमध्ये रस्ते, महामार्ग, बोगदे आणि पूल बांधण्याच्या कार्यात अभूतपूर्व प्रगती झाली आहे व होते आहे. त्यामुळे कनेक्टिव्हिटीची क्रांतीच एक प्रकारे या प्रदेशात घडत आहे आणि लोकांचे जीवन सुधारत आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री म्हणून, मला अनेक प्रकल्पांचे नेतृत्व करण्याचे भाग्य मिळाले. ते प्रकल्प या क्षेत्रासाठी जीवनरेखा ठरले आहेत, ठरणार आहेत. मला नेहमीच असे वाटते की, जम्मू-काश्मीर हा प्रदेश खरोखर स्वर्ग आहे. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून बराच काळ हा प्रदेश मोठ्या प्रमाणात अशांत होता. आधीच दुर्गम आणि त्यात भर म्हणजे पाकिस्तानच्या सीमेलगत! दहशतवादामुळे या प्रदेशातील विकासाच्या समस्या आणखी बिकट झाल्या. जम्मू आणि काश्मीरमध्ये चांगले रस्ते, महामार्ग, बोगदे, पूल, रेल्वेमार्ग नव्हते आणि त्यामुळे व्यापार, उद्योग, रोजगार इत्यादी कोणतेही क्षेत्र विकसित होत नव्हते. २०१४ मध्ये नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली आमचे सरकार केंद्रात सत्तेवर आले, तेव्हा आम्ही पायाभूत सुविधांना सर्वोच्च प्राधान्य दिले. आम्ही जम्मू आणि काश्मीरसाठी विकास आराखडा तयार केला आणि आज या प्रदेशात जे बदल आपण पाहत आहोत आणि भविष्यात जे घडणार आहे, ते सारे सर्वांना आश्चर्य वाटेल असेच आहे. आमचे प्रयत्न भौतिक संपर्क व्यवस्थेच्या पलीकडे जाणारे आहेत.

वाहतूक व्यवस्था आणि बाजारपेठांशी असलेला संपर्क सुधारून आम्ही या प्रदेशाच्या आर्थिक पुनरुज्जीवनाचा मार्ग मोकळा करत आहोत. जम्मू आणि काश्मीरमधील जनता आपल्या दैनंदिन जीवनात झालेला बदल प्रत्यक्ष अनुभवते आहे. शेतकरी आता आपल्या उत्पादनांची वाहतूक अधिक सहजतेने करू शकतात व मोठ्या बाजारपेठा आणि पर्यटन स्थळांपर्यंत पोहोचू शकतात. या प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे आधारस्तंभ भरभराटीला येत आहेत. या पायाभूत सुविधाक्रांतीचा रोजगार निर्मितीवरही खोलवर परिणाम झाला आहे. प्रत्येक प्रकल्पाने हजारो लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करून दिले आहेत. त्यांनी स्थानिकांना सक्षम केले आहे आणि त्यांना त्यांच्या प्रदेशाच्या विकासात योगदान देण्याची संधी दिली आहे. या प्रगतीचे परिणाम शिक्षण आणि आरोग्य सेवेपासून ते शेती आणि उद्योगापर्यंत सर्व क्षेत्रांत जाणवतात. आमचे ध्येय केवळ रस्ते आणि पूल बांधण्यापुरते मर्यादित नाही. या पायाभूत सुविधांच्या माध्यमातून जम्मू आणि काश्मीरमध्ये विश्वास, आशा आणि आकांक्षा निर्माण करणे हे आमचे ध्येय आहे. भारताशी घट्ट नाळ जोडलेला आणि तेथील प्रत्येक नागरिकाला आपण देशाच्या विकासयात्रेचा भाग आहोत, अशी भावना प्रदान करणारा प्रदेश आम्हाला निर्माण करायचा आहे. या कामात आव्हाने मोठी होती. डोंगराळ प्रदेश, प्रतिकूल हवामान आणि सुरक्षाविषयक आव्हाने असे अनेक अडथळे होते. अत्याधुनिक तंत्रज्ञान, नावीन्यपूर्ण नियोजन आणि असंख्य अभियंते आणि कामगारांच्या समर्पित कार्यामुळे प्रतिकूलतेचे संधीत रूपांतर करण्यात आम्ही यश मिळविले आहे.

जम्मू आणि काश्मीरमधील आमचे काम हे पायाभूत सुविधांच्या परिवर्तनकारी शक्तीचे जिवंत उदाहरण आहे. विकास हाच शांतता आणि प्रगतीचा सर्वांत शक्तिशाली मार्ग असल्याच्या आमच्या विश्वासाला त्यामुळे बळ मिळाले आहे. कनेक्टिव्हिटीमध्ये गुंतवणूक करून फक्त रस्ते-पूल बांधणे हा आमचा उद्देश नसून, या माध्यमातून प्रदेशांमधील, समुदायांमधील आणि आकांक्षांमधील दरी भरून काढायची आहे. आमचा दृष्टिकोन स्पष्ट आहे. समावेशक विकास जीवन कसे बदलू शकतो आणि राष्ट्रीय एकता कशी मजबूत करू शकतो, याचे जिवंत उदाहरण म्हणून जम्मू-काश्मीरला घडवायचे आहे. शाश्वतता, समावेशकता आणि नवोन्मेषाच्या तत्त्वांनी प्रेरित असलेला हा प्रवास सुरू ठेवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आतापर्यंत साध्य केलेली प्रगती भविष्यासाठी मोठा आत्मविश्वास देणारी आहे. जम्मू आणि काश्मीर आता फक्त भारताच्या विकास नकाशाच्या परिघावर राहिलेले

नसून ते त्याच्या केंद्रस्थानी आले आहे.

कनेक्टिव्हिटी वाढवण्यासाठी आणि प्रादेशिक विकासाला चालना देण्यासाठी, सरकारने देशभरातील रस्ते आणि बोगदे बांधकाम प्रकल्पांसाठी ११ लाख कोटींची तरतूद केली आहे. पायाभूत सुविधांच्या विकासाचा हा मोठा प्रकल्प आहे, ज्यामध्ये संपर्क–दळणवळण सुधारण्यासाठी आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी महामार्ग, बोगदे, एक्स्प्रेसवे आणि रोपवेचा विकास समाविष्ट करण्यात आला आहे. गेल्या दशकातील ही प्रगती, देशातील विशेषत: जम्मू–काश्मिरातील पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी सरकारची कटिबद्धता दर्शवणारी आहे.

### झेड–मोड बोगदा




अलीकडेच उद्घाटन झालेल्या सर्वांत उल्लेखनीय प्रकल्पांपैकी एक म्हणजे झेड–मोड बोगदा (सोनमर्ग बोगदा), जो ६.५ किमी लांबीचा आहे. २ हजार ७१७ कोटी रुपये खर्च करून बांधलेला हा बोगदा लेह, सोनमर्ग आणि कारगिलपर्यंतचे दळणवळण वर्षभर सुरळीत ठेवेल. फायर अलार्म, वाहतूक नियंत्रण प्रणाली आणि तीन–लेन अप्रोच रोड यासारख्या अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेला हा बोगदा प्रवाशांची सुरक्षा आणि वाहतूक क्षमता दोन्ही वाढवतो.

### झोजिला बोगदा

अशा महत्त्वपूर्ण प्रकल्पांतील आणखी एक म्हणजे झोजिला बोगदा. हा बोगदा १४ किलोमीटरचा आहे आणि त्यात अतिरिक्त १८ किलोमीटरचा अप्रोच रोड आहे. या



प्रकल्पावर सुरुवातीला १० हजार ६४३ कोटी रुपयांचा खर्च होईल, असा अंदाज होता. प्रत्यक्षात फक्त ४ हजार ५०० कोटी रुपयांच्या खर्चाने फेब्रुवारी २०२८ पर्यंत पूर्ण होणारा हा बोगदा आशियातील सर्वात उंच बोगदा असेल. यामुळे श्रीनगर आणि लेह दरम्यानच्या प्रवास वेळेत ३.५ तासांची बचत होईल. हा बोगदा खर्च बचत आणि अभियांत्रिकी उत्कृष्टतेमध्ये नवीन मानके स्थापित करेल. तांत्रिक बाबींचा अभ्यास केल्यानंतर आम्ही या प्रकल्पात सुमारे ६ हजार कोटी रुपये वाचवले आहेत.

सर्व बोगदे पुढील चार वर्षांत पूर्ण करण्याचे आमच्या सरकारचे नियोजन आहे. यामुळे या क्षेत्रात कनेक्टिव्हिटी वाढेल. जम्मू आणि काश्मीरवर आमचे लक्ष दोन खास कारणांसाठी आहे. त्यातील पहिले कारण म्हणजे हा प्रदेश देशाच्या इतर भागांशी सर्वार्थाने जोडायचा आहे आणि दुसरे म्हणजे या प्रदेशातील विकासाची प्रक्रिया गतिमान होणे गरजेचे आहे. जम्मू आणि काश्मीरमधील लोकांचे जीवन सुखी, संपन्न, समृद्ध आणि आनंदी व्हावे, यासाठी हे प्रकल्प सुरू आहेत. हा सीमावर्ती भाग आहे. आमच्या सीमा पाकिस्तान आणि चीनशी जोडलेल्या आहेत. या प्रकल्पांद्वारे राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यांवरही लक्ष दिले जात आहे. कनेक्टिव्हिटीमुळे लोकांना त्रासदायक असलेल्या अनेक समस्या सुटतात, हा विश्वास आम्हाला अटल बोगद्याच्या कामाने दिला. नजीकच्या भविष्यात जम्मू आणि काश्मीरमध्ये अधिक रस्ते, महामार्ग, पूल, बोगदे, रोपवे, रेल्वे इत्यादींचे एक मोठे नेटवर्क असेल आणि हा प्रदेश आपल्या मातृभूमीचा अभिमान असेल.

**(सौजन्य : दै. लोकसत्ता)**

# राज्यातील सिंचनाला नवा आयाम



● **गिरीश महाजन, जलसंपदामंत्री**

> वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प केवळ सिंचन प्रकल्प नसून विदर्भाच्या भविष्यासाठी एक परिवर्तनकारक योजना आहे. यातून कृषी क्षेत्र, रोजगार निर्मितीला हातभार लागेल.

**भारतातील** शेतकरी अन्नधान्याची उत्पादकता वाढविण्यासाठी सिंचन सुविधेवर अवलंबून आहे. तसेच महाराष्ट्र हे औद्योगिकदृष्ट्या अग्रेसर राज्य असून उद्योगांची पाणी मागणी मोठी आहे. राज्यात एकीकडे दरवर्षी लाखो लिटर पाणी वाहून समुद्रात जाते. तर दुसरीकडे दुष्काळामुळे मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्र होरपळून निघतो. यावर तोडगा म्हणून 'नदीजोड प्रकल्प' एक महत्त्वपूर्ण उपाय ठरू शकतो. त्याद्वारे शेतकऱ्यांना अधिक पाणी मिळून शेतीची उत्पादकता वाढेल. कमी पाऊस पडला तरी जलसंचय केल्यामुळे पाणी उपलब्ध राहील.

या प्रकल्पामुळे विदर्भातील अनेक जिल्ह्यांतील सिंचन क्षमतेत वाढ होऊन लाखो हेक्टर जमीन ओलिताखाली येईल. शासनाकडून सर्व विभागांच्या विकासाचा समतोल साधण्यासाठी पुढील प्रकल्पांची कामे प्रस्तावित आहेत. पूर्व-पश्चिम विदर्भ- वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प. मराठवाडा- दमणगंगा- एकदरे गोदावरी नदीजोड प्रकल्प. उत्तर महाराष्ट्र (नाशिक)- दमणगंगा- वैतरणा गोदावरी नदीजोड प्रकल्प. उत्तर महाराष्ट्र- नार-पार गिरणा नदीजोड प्रकल्प. मुंबई महानगर (पिण्याचे पाणी)- दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्प.

## नदीजोड प्रकल्पांचा उद्देश

(१) पेयजल उपलब्धता, कृषी व औद्योगिक क्षेत्रास चालना मिळेल.

(२) शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊन त्यांचे जीवनमान सुधारण्यास मदत होईल.

(३) औद्योगिक क्षेत्रातील वाढीमुळे ग्रामीण व शहरी भागांतील क्रयशक्तीला वाव मिळून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

(४) राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

(५) जलाशय निर्मितीमुळे भूजल पातळीत वाढ होईल व जैवविविधता वाढीस पोषक वातावरण निर्माण होऊन पर्यावरणाचा समतोल राखला जाईल.

(६) सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक प्रगल्भता वाढीस मदत होईल.

(७) पर्यटन क्षेत्रात नवे गुंतवणूक पर्याय उपलब्ध होतील.

(८) नदीजोड प्रकल्प हे महाराष्ट्रासाठीच नव्हे तर देशासाठी सुद्धा आदर्श प्रकल्प होऊन इतर दुष्काळग्रस्त राज्यांसाठी प्रेरणादायक ठरतील.

### विदर्भातील सिंचन अनुशेष

गोदावरी खोऱ्यातील वैनगंगा नदी उपखोऱ्यात मुबलक पाणीसाठा उपलब्ध असतानाही सिंचन व पाणी साठवण क्षमता कमी असल्याने विदर्भ हा प्रगत महाराष्ट्रातील अनुशेषधारक प्रदेश म्हणून गणला गेला आहे. विदर्भ पूर्व व पश्चिम असा विभागला गेला असून पूर्व विदर्भाच्या तुलनेत पश्चिम विदर्भात पाण्याची कमतरता जाणवते.

पूर्व विदर्भातील वैनगंगा नदीस अनेक नद्या मिळत असून वैनगंगा नदीवर गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प आहे. त्याची साठवण क्षमता पूर्ण झाल्यानंतर अतिरिक्त पाणी पुढे वाहून जाते. पश्चिम विदर्भात त्या तुलनेत नद्या लहान व कमी असल्याने आवश्यकतेनुसार पाणी उपलब्ध होत नाही.

पर्यायाने पूर्व विदर्भात ओला दुष्काळ तर पश्चिम विदर्भात कोरडा दुष्काळ अशी परिस्थिती नेहमीच उद्‌भवते. विदर्भातील पाणीटंचाईचे निराकरण करण्यासाठी गोसीखुर्द प्रकल्पातील उपलब्ध अतिरिक्त पाणी पश्चिम विदर्भातील दुष्काळग्रस्त भागात वळविण्याच्या उपाययोजनेबाबत सर्वंकश विचार शासनाच्या दृष्टिक्षेपात असून वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प नावारूपास आला.

### गतिमान व शाश्वत धोरण

राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने राष्ट्रीय पातळीवर व राज्यांतर्गत आंतरखोरे पाणी स्थलांतराच्या योजना आखल्या आहेत. अभिकरणाने सुचविल्यानुसार महाराष्ट्र शासनाने विदर्भातील पाणीतूट असलेल्या क्षेत्रांत प्रस्तावित योजनांच्या अनुषंगाने राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने तांत्रिकदृष्ट्या तुटीचे क्षेत्र, वहन अंतराची लांबी व एकूण उपसा उंची याची तपासणी करून अंतिमत: वैनगंगा (गोसीखुर्द) -नळगंगा (पूर्णा) ही नदीजोड योजना मांडली.

या प्रकल्पाचा व्यवहार्यता अहवाल राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने २०१८मध्ये सादर केल्यानंतरदेखील ही कामे हाती घेणे शिवधनुष्य पेलण्यासारखे होते. मुख्यमंत्री, राज्य शासन व जलसंपदा मंत्र्यांच्या पुढाकाराने युद्धपातळीवर धाडसी निर्णय घेण्यात आले आणि सर्वेक्षणास प्रशासकीय मान्यता मिळाली.

हा प्रकल्प विदर्भातील पाणीटंचाईच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प शेती उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी व विदर्भातील जलव्यवस्थापनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे.

### प्रकल्पाची वैशिष्ट्ये

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प राज्याच्या इतिहासातील सर्वात मोठा प्रकल्प असणार आहे. भंडारा ते बुलढाणा जिल्ह्यापर्यंत ४२६.५४ किलोमीटर लांबीचे कालवे, बोगदे, बंदिस्त नलिका, उपसा व धरणसाठे यांचे जाळे तयार करून वैनगंगा-नळगंगा या नद्या जोडल्या जाणार आहेत. या प्रकल्पामुळे ३.२७ लक्ष हेक्टर जमीन (नागपूर जिल्हा- ९२,३२६ हेक्टर, वर्धा ५६,६४६ हेक्टर, अमरावती ८३,५७१ हेक्टर, यवतमाळ- १५,८९५ हेक्टर, अकोला- ८४,६२५ हेक्टर व बुलढाणा- ३८,२१४ हेक्टर) सिंचनाखाली येणार आहे. यासोबतच विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला आणि बुलढाणा या सहा जिल्ह्यांतील १५ तालुक्यांना लाभ होणार आहे.

वैनगंगा नदीवरील गोसीखुर्द या राष्ट्रीय प्रकल्पाच्या जलाशयातून १७७२ दलघमी अतिरिक्त पाणी पावसाळ्यातील १०० दिवसांत उचल करण्याचे नियोजन आहे. त्यापैकी शेतीकरिता १२८६ दलघमी, घरगुती वापराकरिता ३२ दलघमी, औद्योगिक वापरासाठी ३९७ दलघमी पाणीपुरवठा नियोजित असून वहन व्यय ५७ दलघमी गृहीत आहे.

मुख्य कालवा मार्गाच्या दोन्ही बाजूंना ३१ नवीन धरणांचे बांधकाम करून १० अस्तित्वातील धरणांमध्ये हे पाणी साठवण्याचे प्रस्तावित आहे. ज्यामुळे पाण्याचा प्रभावी पुनर्वापर होईल.

### पहिला टप्पा

प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात राजोली ते निम्न वर्धा प्रकल्पापर्यंत १६७.९० किलोमीटर लांबीचा कालवा बांधण्याची योजना आहे. या टप्प्यात १०.५ किलोमीटरचा बोगदा, २३.५ किलोमीटरची बंदिस्त नलिका आणि १३४ किलोमीटरच्या खुल्या कालव्यांचा समावेश आहे. यामध्ये तीन उपसा योजनांचा वापर करून एकूण ७६ मीटर पाण्याचे उचल करणे प्रस्तावित आहे. यासाठी ४८७ मेगावॅट ऊर्जेची आवश्यकता असेल. या कालव्याद्वारे २३ मार्गस्थ जलसाठे भरले जातील. यात अस्तित्वात असलेल्या सहा जलसाठ्यांची उंची वाढविणे तसेच १७ जलसाठे नव्याने प्रस्तावित आहे. या टप्प्याचा लाभ कुही, उमरेड, हिंगणा, नागपूर, सेलू, आर्वी आणि वर्धा या तालुक्यांना होईल. यामध्ये १४८९७२ हेक्टर सिंचन क्षेत्रासाठी एकूण ५०० दशलक्ष घनमीटर सिंचन क्षमता उपलब्ध होईल.

### दुसरा टप्पा

प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात निम्न वर्धा प्रकल्प ते काटेपूर्णा प्रकल्पापर्यंत १३०.७० किलोमीटर लांबीचा कालवा बांधण्याची योजना आहे. या टप्प्यात ०.५ किलोमीटरची बंदिस्त नलिका आणि १३० किलोमीटरच्या खुल्या कालव्यांचा समावेश आहे. यामध्ये तीन उपसा योजनांचा वापर करून एकूण ७९ मीटर उंची साधण्याचा प्रस्ताव आहे. यासाठी २३५ मेगावॅट ऊर्जेची आवश्यकता असेल. या कालव्याद्वारे ११ मार्गस्थ जलसाठे भरले जातील. या टप्प्याचा लाभ धामणगाव, नांदगाव खंडेश्वर, बाभुळगाव, आणि नेर अशा चार तालुक्यांना होईल. यामध्ये १४०२९८ हेक्टर सिंचन क्षेत्रासाठी एकूण ५०० दलघमी पाणी उपलब्ध होईल.

### तिसरा टप्पा

प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्यात काटेपूर्णा प्रकल्प ते नळगंगा प्रकल्पापर्यंत १२७.९ किलोमीटर लांबीचा कालवा बांधण्याची योजना आहे. या टप्प्यात ३.२२ किलोमीटरचा बोगदा, दोन किलोमीटरची बंदिस्त नलिका आणि १२२ किलोमीटरच्या खुल्या कालव्यांचा समावेश आहे. या कालव्याद्वारे सात मार्गस्थ जलसाठे भरले जातील. या टप्प्याचा लाभ बार्शीटाकळी, अकोला, शेगाव आणि बुलढाणा या तालुक्यांना होईल. यामध्ये ८२.००७ हेक्टर सिंचन क्षेत्रासाठी एकूण २८५.२४ दलघमी सिंचन क्षमता उपलब्ध होईल.

### चौथा टप्पा

वाशीम जिल्ह्यातील नळगंगा ते पैनगंगेपर्यंत सिंचन क्षेत्र व जलसाठ्यांची निर्मिती करण्यासाठी अभ्यास प्रस्तावित आहे.

### प्रकल्पाचे फायदे

या प्रकल्पामुळे सिंचन क्षेत्रात वाढ होऊन उत्पादन वाढेल. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावेल. औद्योगिक पाणी वापर वाढून विकासाला चालना मिळेल. ग्रामीण व शहरी भागांत रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन विकासाचा समतोल राखला जाईल. भूजल पातळीत वाढ होऊन पर्यावरणपूरक वातावरण निर्माण होईल. नवीन जलाशयांच्या निर्मितीमुळे पर्यटनास प्रोत्साहन मिळेल. सोयाबीनचे क्षेत्र संतुलित राहील, तसेच रब्बी हंगामात गहू, हरभरा आणि सूर्यफुलाचे उत्पादन वाढेल. कापसाची लागवड वाढेल आणि नागपूर व वर्धा जिल्ह्यांत त्याचे क्षेत्र ६० टक्क्यांपर्यंत जाईल. रब्बी पिकांचे उत्पादन वाढून पीक फेरपालट सुधारेल आणि जमिनीचा पोत टिकून राहील. भाजीपाला, हळद आणि मिरचीसारख्या उच्च मूल्यांच्या पिकांचे उत्पादन वाढेल.

### प्रकल्पाची सद्यस्थिती

भाग–१ मधील कामाकरिता १२३२.०६ कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच प्रकल्पातील बांधकाम घटकास ८७३४२.८६ कोटी किमतीस तत्त्वत: मान्यता देण्यात आली आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन सर्वेक्षण प्रगतिपथावर आहे. पूर्व व पश्चिम विदर्भाला जलमार्गाने जोडणारा महत्त्वाकांक्षी असा वैनगंगा–नळगंगा नदीजोड प्रकल्प विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूरअंतर्गत कार्यान्वित आहे. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तीन मंडळे कार्यरत असून त्यांचे नियंत्रण करण्यासाठी सहनियंत्रण कक्षाची स्थापना नागपूर येथे करण्यात आली आहे. वैनगंगा–नळगंगा नदीजोड प्रकल्प हा संपूर्ण विदर्भाच्या भविष्यासाठी एक परिवर्तनकारक प्रकल्प आहे. यामुळे शेतीसह औद्योगिक आणि नागरी विकासालाही गती मिळेल.

**(सौजन्य : दै. लोकसत्ता)**

# घुसखोरांची वकिली महागात पडेल



● **केशव उपाध्ये**, प्रदेश मुख्य प्रवक्ते

> भारताच्या सीमांची सुरक्षा ही राष्ट्रीय सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. बांगलादेशी घुसखोरीचा प्रश्न गंभीर झाला असून, २०१४ पूर्वीच्या सरकारांनी यावर कोणतीही ठोस पावले उचलली नाहीत. परंतु मोदी सरकारने 'इमिग्रेशन आणि परदेशी नागरिक विधेयक २०२५' संसदेत मांडण्याचा निर्णय घेतला आहे, जो घुसखोरीला आळा घालण्यासाठी क्रांतिकारी ठरेल. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही यासंदर्भात कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. विविध राज्यांमध्ये ही समस्या गंभीर असून, घुसखोरांना राजकीय पाठबळ मिळत असल्याचे आरोप होत आहेत. त्यामुळे देशाच्या सुरक्षिततेसाठी सरकारच्या निर्णयाला व्यापक पाठिंबा देण्याची गरज आहे.

**'देशाच्या** सीमा या तलवारीच्या टोकाने आखायच्या असतात, चरख्यावरच्या सुताने नव्हे', असे स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर म्हणाले होते. देशरक्षणासाठी प्रसंगी कठोर होण्याचे महत्त्व त्यातून अधोरेखित होते. विशेषत: बांगलादेशाच्या सीमेवरून होणारी धोकादायक घुसखोरी रोखण्यासाठी स्वातंत्र्य मिळाल्यापासून ते भाजपप्रणीत सरकार सत्तेत येईपर्यंतच्या ६६ वर्षांच्या काळात तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी काय केले, याचे उत्तर कधीतरी त्यांनी द्यावे. या पार्श्वभूमीवर आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने घुसखोरांना रोखण्यासाठी 'इमिग्रेशन आणि परदेशी नागरिक विधेयक २०२५' संसदेत मांडण्याची केलेली तयारी म्हणजे घुसखोरीला पायबंद घालणारे क्रांतिकारी पाऊल म्हणावे लागेल.

आता केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही नुकतेच अवैध बांगलादेशी आणि रोहिंग्यांना भारतात घुसण्यास मदत करणाऱ्या नेटवर्कवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलिसांना दिले आहेत. मुंबईत तर गेल्या दोन महिन्यात साडेतीनशे बांगलादेशी घुसखोरांना अटक करण्यात आली आहे. घुसखोरीविरोधात आक्रमकपणे असे प्रथमच घडते आहे. अलिकडेच मुंबईतील कफ परेड येथे पकडला गेलेला बांगला देशी नागरिक गेली ३४ वर्षे भारतात रहात असल्याचे उघडकीस आले. बनावट कागदपत्रांच्या आधारे आधारकार्ड आणि निवडणूक कार्ड मिळवून त्याने मागील लोकसभा निवडणुकीत त्याने मतदानही केले होते. घुसखोरांचा वर्षानुवर्षे कसा वापर करून घेतला जात आहे त्याचे हे जिवंत उदाहरण. असे

अनेक राज्यांमध्ये गेल्या अनेक दशकांपासून सुरू आहे. २०१४ पर्यंतच्या केंद्र आणि राज्य सरकारने त्याबाबत काय केले हे जनतेसमोर आले पाहिजे.

आता यावर नेहमीप्रमाणे विरोधकांची कोल्हेकुई सुरू होईल. कारण विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या काही राज्यांमध्ये त्यांचे राजकारणच बांगलादेशातून होणाऱ्या घुसखोरीवर अवलंबून आहे. या घुसखोरांच्या जीवावरच त्यांचे राजकीय अस्तित्व टिकून असल्याने येत्या काळात त्यांचा कांगावा पाहावयास मिळेल यात नवल नाही. किमानपक्षी जाहीरपणे घुसखोरीविरोधी धोरणाला विरोध करता आला नाही तरी छुप्या मार्गाने या घुसखोरांच्या बचावाचे राजकारण सुरू होईल यात शंकाच नाही.

पश्चिम बंगालमध्ये भारत-बांगलादेश सीमेवरून होणाऱ्या घुसखोरीची समस्या अतिशय गंभीर आहे. तिथे सीमा सुरक्षा दल आणि घुसखोरांमध्ये चकमकी होण्याच्याही अनेक घटना घडल्या आहेत. असे असताना पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी सीमा सुरक्षादल हेच वेगवेगळ्या भागातून बंगालमध्ये घुसखोरी करत असल्याची संतापजनक ओरड करत आहेत. वस्तुस्थिती ही आहे की पश्चिम बंगालमध्ये घुसखोरांचा पहिला मुक्काम असतो. याचे कारण येथे अनेक वर्षांत लाखो बांगलादेशी स्थायिक झाले आहे. हे सारे कुणाच्या पाठबळामुळे घडते आहे? सीमा भागात शेकडो गावे अशी आहेत जिथे आज हिंदू नावालाही शिल्लक नाहीत. सौदी अरेबिया, कुवैत, लिबिया आणि अन्य इस्लामी देशांकडून घुसखोरांना मोठ्या प्रमाणात निधी पुरवला जात आहे. यात शेकडो लोक गुन्हेगारी प्रवृत्तीचे असतानाही ममता बॅनर्जी त्यांची पाठराखण करत आहेत. घुसखोरांच्या तपासणीला त्यांनी विरोध केल्याने आसाममधील अनेक घुसखोर पश्चिम बंगालमध्ये आश्रयाला गेले आहेत. २०१४ मध्ये तृणमूल काँग्रेसचे राज्यसभेच्या खासदाराच्या घरात जमाते इस्लामी बांग्लादेशचे दहशतवादी मारण्यात आले आणि मोठ्या प्रमाणात स्फोटके पकडण्यात आली. एवढे झाल्यानंतरही ममता बनर्जी सरकार केंद्राला त्याची माहिती देण्यास तयार नव्हत्या. या खासदाराविरुद्ध खटला सुरु आहे.

२००७ साली संसदेत सर्वात प्रथम बांगलादेशी घुसखोरांचा मुद्दा चर्चेत आला होता त्यावेळी तत्कालीन केंद्रीय गृहराज्यमंत्री श्रीप्रकाश जयस्वाल यांनी देशात एक कोटी २० लाख बांगलादेशी नागरिकांनी घुसखोरी केल्याचे

> शेजारच्या देशांमधून होणाऱ्या घुसखोरीला रोखण्यासाठी मोदी सरकारने संसदेत विधेयक आणले आहे. हे विधेयक अनेक अर्थांनी देशाची सुरक्षा मजबूत बनवणारे ठरेल.

संसदेत सांगितले होते. आता ही संख्या कैक पटीत असेल. वैद्यकीय आणि पर्यटक व्हिसा घेऊन घुसखोर भारतात प्रवेश करतात. त्यानंतर ते मायदेशी न जात भारतामध्येच वास्तव्य करतात. बांगलादेशींना घुसखोरीस मदत करण्यासाठी दलाल मदत करतात. आतापर्यंत सुमारे १२ लाख बांगलादेशी भारतात आल्यावर गायब झाले आहेत. १९७१ ते २०१४ या ४३ वर्षांच्या कालावधीत आसाममध्ये ४८ हजार बांगलादेशी घुसखोर शिरले. आताही बांगलादेशातील सत्तापालटानंतर तेथील हिंदू अत्याचाराविरोधात लढत आहेत तर मुस्लिम पळून भारतात घुसखोरी करत असल्याचे आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्व सरमा यांनी घुसखोरीच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. काही राज्यांकडून व्होट बँक डोळ्यासमोर ठेवून अशा घुसखोरांना आश्रय दिला जात आहे. त्यांच्या अशा धोरणामुळे देशातील अनेक प्रदेशांमध्ये लोकसंख्येचा समतोल ढासळला आहे.

देशहिताच्या निर्णयाबाबत सरकारच्या मागे उभे राहण्याऐवजी त्यावर राजकीय पोळी भाजण्यात विरोधी पक्ष गुंतलेले आहेत. वास्तविक, सीमेलगतच्या राष्ट्रांबाबत अशा प्रकारच्या घटना घडतात तेव्हा राज्यकर्ते आणि विरोधी पक्ष यांचे लक्ष या घडामोडींकडे जायला हवे. मात्र तसे होताना दिसत नाहीये. आगामी काळात आपण आपला मतदानाचा अधिकार वापरून घुसखोर समर्थक पक्षांविरुद्ध मतदान करून या घुसखोरीच्या प्रश्नाला वाचा फोडली पाहिजे. निवडणुकीत मोहिम सुरू करून राजकीय पक्षांना मोठ्या प्रमाणावर त्यांचे धोरण बदलायला लावण्याची गरज आहे. देशाच्या सुरक्षेची चाड असणाऱ्या जनतेने हा धोका वेळीच ओळखला पाहिजे. पश्चिम बंगाल, आसामसह सर्वच राज्ये घुसखोरमुक्त बनवू, असा निर्धार केला पाहिजे. राजकीय पक्षांनीही एकाही घुसखोराला तिकीट देता कामा नये यावर लक्ष ठेवले गेले पाहिजे. सुरक्षा सर्वोपरि हे ध्यानात ठेवायला हवे. ■

# महाराष्ट्रातील नंबर प्लेट्स सर्वात स्वस्त

● आनंद देवधर

HSRP नंबर प्लेट्स आता अनिवार्य होणार आहेत. महाराष्ट्र राज्यात या नंबर प्लेट सगळ्यात महाग आहेत अशी बातमी वाचनात आली. बातमीत दिलेल्या आकडेवारीत इतर राज्यांच्या तुलनेत हा फरक खूपच मोठा होता. तेंव्हाच माझ्या मनात शंका आली की यात काहीतरी गडबड आहे. खुलासा होईपर्यंत वाट पाहिली पाहिजे. म्हणून मला लोकांनी डिवचले तरीसुद्धा मी यावर काहीही लिहिले नाही. माझी शंका खरी ठरली आहे.

**महाराष्ट्रात** या नंबर प्लेट्स महाग आहेत हे दाखवणारा तक्ता एबीपी माझाने जाहीर करताच विरोधक फडणवीस सरकारवर तुटून पडले. यात पॉपकॉर्न समर्थकही होतेच परंतु काही कट्टर समर्थकसुद्धा खाजगी ग्रुपमध्ये फडणवीस सरकारविरुद्ध मत नोंदवू लागले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः पत्रकार परिषदेत या सर्व बातम्या खोट्या आहेत आणि त्यावर सामान्य जनतेने विश्वास ठेवू नये असे आवाहन केले.

महाराष्ट्र राज्यात जाहीर झालेले दर हे नंबर प्लेटची किंमत, फिक्सिंग चार्जेस आणि जीएसटी हे सर्व मिळून आहेत. इतर राज्यांचे जाहीर झालेले दर हे फक्त नंबर प्लेटची किंमत आहेत.त्यात फिक्सिंग चार्जेस आणि जीएसटी समाविष्ट केलेला नाही. त्यामुळे मुळात अशी तुलना करणेच चुकीचे होते. पत्रकार परिषदेत श्री.फडणवीस




यांनी दुचाकी वाहनांबाबत किंमतीचा तपशील जाहीर केला. इतर राज्यांतील दर ४५१ पासून ५०६ इतके आहेत तर महाराष्ट्रात हा दर ४५० रुपये आहे. याचा सरळ सरळ अर्थ असा आहे की इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात दुचाकी वाहनांचा नंबर प्लेटचा खर्च सगळ्यात कमी आहे. इतर प्रकारच्या वाहनांबद्दलही अशीच परिस्थिती जवळपास अशीच आहे. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील किंमत थोडीशी कमी जास्त आहे.

मला आमच्या समर्थकांचे आश्चर्य वाटते. फडणवीस यांनी खुलासा केला त्याला आता दोन-तीन दिवस उलटून गेले आहेत. विरोधात लिहिताना त्यांना दोन मिनिटेही लागत नाहीत परंतु ती बातमी खोटी आहे हे कळल्यानंतरही स्वतःच्या वॉलवर टाकत नाहीत किंवा ज्या ग्रुपमध्ये आपण शिव्या घातल्या होत्या त्या ग्रुपमध्ये सत्य परिस्थिती मांडत नाहीत. मुळात या बातमीवर विश्वास ठेवण्याचे कारणच काय? इतका मोठा फरक दोन राज्यांमध्ये असूच शकत नाही हे यांना कळत नाही काय? इतका मूर्खपणा फडणवीस सरकार करेल असे यांना वाटलेच कसे? या बातमीत काहीतरी काळेबेरे असेल याची शंका का आली नाही? याचा अर्थ फडणवीस सरकारवर या समर्थकांचा विश्वास नाही असाच होतो. विरोधकांचे काय ते तर अशा खोट्या बातम्या ताबडतोब उचलून धरतात. आपण त्या खऱ्या मानण्याआधी जरा अधिकृत खुलाशाची वाट पाहणे आवश्यक नाही काय? सरकारकडून खुलासे होत असतात पण अविचारीपणाने कढईत ताबडतोब उडी टाकून तडतडण्याची काहीही गरज नाही. ■

# यूएस-एड (USAID)- जगातील सामाजिकतेला मदत की अमेरिकेच्या पोलिसगिरीला?

● अमिता आपटे

USAID आणि तिची भगिनी संस्था, नॅशनल एन्डॉवमेंट फॉर डेमोक्रसी (NED) सारख्या एजन्सींचा वापर अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाची साधने म्हणून आजवर केला गेला असून लोकशाही प्रमोशनच्या नावाखाली अमेरिकेला सोयीच्या भूमिका तिथल्या सरकारांनी घ्याव्यात, असा दबाव निर्माण केला जात होता, हेही दिसू लागले आहे.



**युक्रेन,** निकाराग्वा आणि मंगोलियासारख्या देशांत रंग क्रांतीच्या नावाने जे अराजक माजले, त्यातील NED च्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह लागले आहे. हे हस्तक्षेप खरोखर लोकशाहीशी सुसंगत आहेत, की केवळ अमेरिकेचा प्रभाव प्रस्थापित करण्याचे माध्यम आहेत? याची गंभीरता समजण्यासाठी अजून एक मुद्दा पाहू. ट्रेझरी ॲक्सेस सिम्बॉल (TAS) हा ट्रेझरी पेमेंटला अमेरिकेच्या बजेट लाइन आयटमशी जोडणारा account books मधील एक Identification code आहे. फेडरल गव्हर्नमेन्टसच्या कार्यकाळात या TAS च्या रकान्यांत काहीच माहिती न भरता बहुतेक वेळा ते रिकामेच ठेवले जात असल्याचे आढळून आले आहे. ही एकूण रक्कम भारताच्या वार्षिक GDP पेक्षाही मोठी म्हणजे ४.७ ट्रिलियन डॉलर्स इतकी अवाढव्य आहे. इतका पैसा कुठे आणि कसा खर्च झाला याचा शोध घेणे जवळजवळ अशक्य आहे. अशा गोष्टी ट्रम्प सरकार उघड करत असल्यामुळे जगाला आता US-AID च्या कृष्णविवरात काय घडले असावे, याचा अंदाज बांधता येऊ लागला आहे.

### US-AID भारतीय परिप्रेक्ष्यात

प्रदीर्घ काळापासून अमेरिकेतून आर्थिक मदत मिळवणाऱ्या देशांतील सर्वाधिक मदत पाठवली जाणारा देश भारत आहे. २०१०-११ दरम्यान, आरोग्यविषयक उपक्रम, शिक्षण, आपत्ती निवारण अशी विविध कारणे देऊन अमेरिकेतून भारतात ६५० दशलक्ष डॉलर्सपेक्षाही जास्त मदत पाठवली गेली होती. एशियातील भारताचे धोरणात्मक महत्त्व आणि जागतिक स्तरावर त्याचा वाढता प्रभाव पाहता, US-AID चे हे मदत निधी कार्यक्रम भूतकाळात अमेरिका आणि भारत यांच्यातील द्विपक्षीय संबंधांचा प्रमुख आधारस्तंभ राहिले आहेत. स्पष्ट सांगायचे तर अमेरिकेकडून येणाऱ्या निधीच्या बदल्यात तत्कालीन भारतीय सत्ताधिकाऱ्यांनी अमेरिकेला सोयीची धोरणे राबविली आहेत. तत्कालीन सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे भारत प्रगत राष्ट्रांमध्ये समाविष्ट होऊ शकला




## या लेखासाठीच्या संदर्भ लिंक

**News At A Glance**

https://swarajyamag.com/world/the-postmortem-of-usaid-and-what-it-means-for-india

https://www.indiatoday.in/world/story/donald-trump-usaid-funded-pakistan-ngo-link-to-terrorist-organisation-lashkar-e-taiba-let-falahs-e-insaniat-2675197-2025-02-05

https://www.ndtv.com/india-news/usaid-biggest-scam-in-history-sanjeev-sanyal-adviser-to-pm-narendra-modi-after-doges-india-voter-funds-claim-7728420

https://www.thehindubusinessline.com/data-stories/data-focus/usaid-shutdown-may-not-have-a-significant-impact-on-india/article69179811.ece

**Academic Insight**

https://2017-2020.usaid.gov/india/health#:~:text=A%20SHARED%20INDIA%E2%80%93U.S.%20HEALTH,India%20supporting%20effective%20health%20care.

https://2017-2020.usaid.gov/india/us-india-triangular-cooperation

**By the Numbers**

https://www.usnews.com/news/best-countries/articles/countries-that-receive-the-most-foreign-aid-from-the-u-s

https://twitter.com/Starboy2079/status/1890982369806446762

https://twitter.com/DOGE/status/1891614960452522187

https://www.moneycontrol.com/news/business/economy/over-a-fifth-of-usaid-s-2-9-billion-assistance-to-india-since-2001-came-in-last-four-years-12930184.html


https://www.dawn.com/news/1194228

नाही, हे भारतीय विचारांच्या समाजशास्त्रज्ञ आणि अर्थतज्ज्ञांचे मत आता सत्य सिद्ध होत आहे.

भारताच्या देशांतर्गत राजकारणावर या परकीय संस्थांच्या प्रभावाबाबत राष्ट्रीय विचाराच्या मंडळींनी कायमच चिंता व्यक्त केली आहे. अशा संस्था राष्ट्रीय

सार्वभौमत्वाला हानी पोहोचवू शकतात, ही या मंडळींची भीती किती यथार्थ होती! आणि असे असूनही केवळ स्वार्थ आणि सत्तालालसेपायी तत्कालीन राज्यकर्त्यांनी संपूर्ण देशाला आणि इथल्या जनतेला जणू काही तोफेच्या तोंडावरच बसवले होते. हे frauds त्या काळात थांबवता आले नव्हते, तरी इतक्या वर्षांनी का होईना, पण निदान आता तरी उघड होत आहेत.

विविध स्वयंसेवी संस्था, विशेषतः जोशुआ प्रोजेक्ट सारख्या अमेरिकेतून निधी प्राप्त झालेल्या संस्थांनी त्या पैशाच्या बदल्यात भारतीय समाजातून संवेदनशील माहिती गोळा करण्याचे काम करणे, सामाजिक व्यवस्था उध्वस्त करणाऱ्या देशविघातक गोष्टींना प्रोत्साहन देणे इत्यादी कार्यक्रम भारतात चालवले, हे आता सिद्ध होत आहे. विविध चर्च संस्थांना धर्मांतरणासाठी पैसा कुठून येतो, ते उघड होत आहे. अजून वेगळे उदाहरण म्हणजे ऑर्गनाइज्ड क्राइम अँड करप्शन रिपोर्टिंग प्रोजेक्ट (OCCRP) ही संस्था. या संस्थेला US-AID कडून निधी प्राप्त होत राहिला आहे. या संस्थेने वारंवार भारतीय उद्योगपती गौतम अदानी यांना लक्ष्य केले. आपल्या तपास अहवालांद्वारे, OCCRP ने या दाव्यांचे समर्थन करण्यासाठी, निश्चित पुरावे सादर न करता, अदानींच्या उदयाचा संबंध पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी जोडण्याचा प्रयत्न करत, भारतातील क्रोनी भांडवलशाहीचे काल्पनिक चित्र रंगवून भारतीय समाजाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न सतत केला आहे. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय घडामोडींवर नजर ठेवणारी संस्था freedom house मध्येही USAid ची गुंतवणूक आहे. भारतीय लोकशाही मूल्यांवर सातत्याने टीका करण्याचे काम या संस्थेने केले आहे. वर्षानुवर्षे, फ्रीडम हाऊसने भारतातील लोकशाहीचा दर्जा खालावला आहे, इथे हिटलरशाही, हुकूमशाही आहे, असे म्हणत जागतिक क्रमवारीत भारताला अगदी खालच्या स्तरावर ठेवले आहे. तीच गोष्ट freedom of speech आणि freedom to press या क्रमवारींची सुद्धा. प्रत्यक्षात समाजात वावरताना अगदी मोदीविरोधी मंडळीही आपले विचार अगदी मोकळेपणाने मांडत असलेले आपण पाहतो. पण या जागतिक क्रमवारींमध्ये मात्र हा दर्जा अगदी खालावलेला दिसतो. हा जो विरोधाभास आहे, त्यामागे US-AID आहे, हे आता या निमित्ताने लोकांना कळून चुकले आहे. २१ मिलियन डॉलर्स इतकी प्रचंड रक्कम



बायडेन administration ने भारतातील मतदार टर्न आऊटसाठी म्हणून भारतात पाठवली. भाजपला अपेक्षेपेक्षा खूप कमी जागा लोकसभा निवडणुकीत का मिळाल्या असतील?, ते आता सहजच समजून येऊ शकते. फुकट ते पौष्टिक नसते, तर फुकट ते खवट असते त्याने पोट दुखते, हे या निमित्ताने भारतीयांना कळले तरी खूप झाले.

### US-AID चे पोस्टमॉर्टम

USAID चे संभाव्य विघटन किंवा पुनर्रचना याबाबत विविध प्रश्न शंका जगभरातून उपस्थित केले जात आहेत. एका विचारप्रवाहानुसार ट्रम्प प्रशासनाच्या अंतर्गत जागतिक वचनबद्धतेतून अमेरिकेने माघार घेणे, हे अमेरिकेच्या पतनाचे लक्षण ठरेल, तर काही लोकांना हे मूळ राष्ट्रीय हितांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी आणि नंतर अधिक अराजक आणि माघार टाळण्यासाठीचे आवश्यक पाऊल वाटते. दोन्ही बाबतीत, हे स्पष्ट आहे की, आपण एका युगाच्या समाप्तीचे साक्षीदार आहोत. अर्थातच या बदलाचा अर्थ अमेरिका एक विघटनकारी शक्ती बनणे थांबवेल, असा नाही. रूल-बेस्ड ऑर्डर टिकवण्यासाठी ट्रम्प सरकार अधिकच आक्रमकही होऊ शकते. त्यामुळे US-AID बंद करणे हा राष्ट्रीय विचाराच्या गटांना एक विजय आहे, असे वाटत असले तरी, भारताने या USA-ID ची जागा आता कोणत्या विध्वंसक शक्तीचे मॉडेल घेईल? त्यांची कार्यपद्धती कशी असेल? याबाबत अखंड जागरुक राहणे आवश्यक आहे. अमेरिकी प्रभावाचे रूप बदलू शकते, परंतु तो नवनवीन मार्गांनी कायम ठेवण्याचा प्रयत्न नक्कीच केला जाणार आहे. USAID च्या भवितव्यावरील हा वादंग केवळ अमेरिकेतून येणाऱ्या परकीय गंगाजळीबद्दल नाही, तर यूएसच्या परराष्ट्र धोरणाच्या भविष्याबद्दल आहे, इतपत समज आता सर्वांनाच आली आहे. **(समाप्त)**

# उज्वल भविष्याचा अर्थसंकल्प

२१ व्या शतकातील तिसरे दशक विकसित भारताचा संकल्प साकार करण्याच्या दिशेने अतिशय महत्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या ११ वर्षात केंद्र सरकारने विकसित भारताचा संकल्प पूर्ण करण्यासाठी आधारस्तंभ तयार करून नवनिर्मितीच्या दिशेने पाऊल टाकले आहे. मागील केंद्रीय अर्थसंकल्प या दशकाच्या अखेरपर्यंतचा दृष्टीकोन केंद्रस्थानी ठेवून तयार करण्यात आला होता, तर १८ व्या लोकसभेचा हा सर्वसाधारण अर्थसंकल्प मांडताना तेच सातत्य राखले आहे, कारण समग्र दृष्टीकोनासह सर्वांगीण विकास हाच आता केंद्र सरकारचा मंत्र आहे.१८व्या लोकसभेचा दुसरा अणि वर्ष २०२५-२६ चा सर्वस्पर्शी-सर्वसमावेशक केंद्रीय अर्थसंकल्प बनला आहे. विकसित भारताचा विराट आणि निर्णायक संकल्प साकार करण्याच्या निरंतरतेचे प्रतीक...

**जेव्हा** इच्छाशक्ती प्रबळ असते. साकार करण्याचा दृष्टिकोन जेव्हा स्वप्नांच्या पलिकडचा असतो,'राष्ट्र प्रथम' या विचाराने जेव्हा धाडसी निर्णय घेण्याचा आणि तो अंमलात आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचा निर्धार असतो, तेव्हाच सातत्य राखत असा केंद्रीय अर्थसंकल्प आकाराला येतो. नव्या भारताच्या केंद्रीय अर्थसंकल्पात याची झलक सातत्याने दिसून येत आहे. राष्ट्राच्या सर्वांगीण,



सर्वस्पर्शी आणि सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टिकोनासह केंद्र सरकारने गेल्या ११ वर्षांमध्ये ज्याप्रकारे विकासाची गाथा लिहिली आहे, तीच आता २०४७ च्या स्वर्णिम भारताच्या संकल्पाकडून सिद्धीचा मार्ग प्रशस्त करत आहे. दीर्घकालीन विचार करून दरवर्षी सादर होणारा सर्वसाधारण अर्थसंकल्प यावेळीही अभूतपूर्व-ऐतिहासिकरित्या समाजातील प्रत्येक घटकाला सशक्त करणारा आहे. ज्याचा उद्देश आहे-अमृत काळात सशक्त भारताचे असे चित्र पुढे नेणे, जिथे सातत्याने धोरणात्मक उपक्रमांमधून पायाभूत सुविधा विकासाला गती मिळेल आणि असंख्य रोजगाराच्या नवीन संधींसह निर्मिती क्षेत्राला चालना मिळेल. उत्तम विकास आणि उज्वल भविष्याची हमी बनलेला हा अर्थसंकल्प गाव, गरीब, शेतकरी, युवक, महिला, आदिवासी, दलित, वंचित, आर्थिक सामाजिकदृष्ट्या मागास तसेच शहरी आणि मध्यमवर्गीय लोकांच्या समृद्धी आणि सक्षमीकरणाची ब्लू प्रिंट म्हणून समोर आला आहे.

खरे तर 'राष्ट्र प्रथम? या दृष्टिकोनासह धाडसी निर्णय घेणे आणि ते प्रत्यक्षात आणण्यासाठी झटणे, हा कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाचा पाया असतो. त्यामुळे दरवर्षीप्रमाणेच यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प हा नवी ऊर्जा भरणाऱ्या विकासाच्या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा बनला आहे. यावेळच्या केंद्रीय अर्थसंकल्पाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे, ते म्हणजे साधारणपणे अर्थसंकल्पाचा भर सरकारी तिजोरी कशी भरायची यावर असतो. मात्र हा

अर्थसंकल्प त्याच्या अगदी विरुद्ध आहे. हा अर्थसंकल्प देशातील नागरिकांचा खिसा कसा भरेल, देशातील नागरिकांची बचत कशी वाढेल आणि देशाचे नागरिक विकासाचे भागीदार कसे बनतील, याचा भक्कम पाया रचणारा आहे. यापूर्वीच्या सर्व अंदाजांच्या पुढे जाऊन केंद्र सरकारने प्राप्तिकरातील सवलतीची आतापर्यंतची कमाल मर्यादा १२ लाख रुपये केली आहे, जी पगारदार व्यक्तींसाठी प्रमाणित वजावटीसह १२.७५ लाख रुपये असेल.

तर वर्ष २०१३-१४ मध्ये प्राप्तिकरातील सवलत केवळ २.२ लाख रुपये होती आणि एका दशकात विद्यमान सरकारने सवलतीची मर्यादा जवळपास सहा पटीने वाढवली आहे. या सवलतीमुळे मध्यमवर्गीय आणि समाजातील सर्व घटकांना केवळ मोठी भेट मिळाली नाही, तर बचत, गुंतवणूक, उपभोग आणि विकासालाही प्रोत्साहन दिले आहे. या अर्थसंकल्पामधून सर्वच घटकांना काही ना काही लाभ आणि सुविधा देऊन एक सर्वसमावेशक संतुलित अर्थसंकल्प देशासमोर ठेवला आहे. मागील एका दशकात झालेला विकास आणि भारताच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न जपलेल्या देशाने विकासाच्या पुढील प्रवासासाठी कृषी, एमएसएमई, गुंतवणूक, निर्यातीला शक्तिशाली इंजिन बनवले आहे.

'सबका साथ-सबका विकास' या विचारासह सर्वसमावेशकता ही त्याची प्रेरणा आहे व त्याचे ध्येय आहे- विकसित भारत. अर्थसंकल्पात यावेळीही पूर्वोद्याचा दृष्टीकोन अंगिकारला असून विकासाचा लाभ सर्वदूर पोहोचावा तसेच देशातील सर्व क्षेत्रांचा एकाच वेगाने विकास व्हावा, इतर भागांप्रमाणेच पूर्वेकडील भागाचाही सर्वांगीण विकास व्हावा, हे त्यामागील उद्दिष्ट आहे. याअंतर्गत बिहारमध्ये मखाना मंडळ व इतर विशेष उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. यावेळी (२०२५-२६) सर्वसाधारण अर्थसंकल्पाची व्याप्ती ५०.६५ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचली असून,यावरून भारताची अर्थव्यवस्था किती वेगाने विकसित होते आहे, हे दिसून येते.

### मध्यमवर्गीयांच्या मनातील गोष्ट

अत्यंत वेगाने परिवर्तन होत असलेल्या भारतात विकास असो किंवा व्यवस्था, साहस असो किंवा निर्धार करण्याची क्षमता असो, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात भारतातील मध्यमवर्ग आज एक प्रमुख प्रवाह बनला आहे.

> प्रथमच उद्योजक बनू इच्छिणाऱ्या देशातील अनुसूचित जाती, जमातीतील व्यक्ती आणि महिलांना कोणत्याही हमीशिवाय २ कोटी रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून देण्याची योजना सुरु करण्यात आली आहे.
>
> **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

समृद्ध व विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी एक तृतीयांश इतकी लोकसंख्या व्यापणारा मध्यमवर्ग एक मोठी शक्ती आहे. या मध्यमवर्गीयांच्या आशा आकांक्षांना केंद्र सरकारमुळे गेल्या दशकभरात नवीन पंख मिळाले आहेत. या वर्षीच्या गरीब व मध्यमवर्गीयांच्या दृष्टीने कल्याणकारी अर्थसंकल्पाची जगभरात चर्चा होत आहे. विकसित भारताच्या निर्मितीसाठी सर्वांनी एकत्र यावे, सर्वांनी कार्य करावे आणि सर्वांनी मिळून प्रयत्न करावेत, यादृष्टीने हा अर्थासंकल्प नवीन सामर्थ्य प्रदान करणारा आहे. भारत ज्यावेळी आपल्या स्वातंत्र्याचा शतक महोत्सव साजरा करत असेल, त्यावेळच्या सशक्त भारताचा पाया यावर्षीच्या अर्थसंकल्पाने अधिक मजबूत केला आहे. हा अर्थसंकल्प समर्थ भारत, समृद्ध भारत, स्वावलंबी भारत, सामर्थ्यशाली भारत, गतिमान भारताच्या या दिशेने टाकलेले मोठे पाऊल आहे. स्वातंत्र्याच्या अमृत काळात कर्तव्यपूर्ती करत असताना विकसित भारताच्या संकल्पपांच्या पूर्तीसाठी या अर्थसंकल्पाचे मोठे योगदान असेल. या अर्थसंकल्पात गाव, गरीब, शेतकरी, वंचित, आदिवासी, मध्यमवर्ग, महिला, तरुण, ज्येष्ठ या सर्वांसाठी मोठे निर्णय घेण्यात आले आहेत.

भारताने राष्ट्रीय स्तरावर झपाट्याने वाढणारा मध्यमवर्ग पाहिला आहे. दारिद्र्यरेषेच्या पातळीत तीव्र घट झाल्यामुळे हे साध्य झाले आहे, हे प्रमाण आता लोकसंख्येच्या सुमारे १६ टक्क्यांपर्यंत खाली आले आहे. एकूण संख्येच्या दृष्टीने पाहिल्यास, लोकसंख्येपेकी सुमारे एक तृतीयांश लोकसंख्या मध्यमवर्गात मोडते. कृषी क्षेत्र असो, लघुउद्योग क्षेत्र असो, कष्टकरी समाजातील लोक असोत, जवळपास सर्वच लोक एकप्रकारे भारताचा मोठा मध्यमवर्ग आहे. या सर्वांच्या इच्छा आकांक्षांना लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र



> हा अर्थसंकल्प केवळ देशाच्या सध्याच्या गरजाच लक्षात घेत नाही तर भविष्यासाठी सज्ज होण्यास देखील मदत करतो. स्टार्टअप्ससाठी डीप टेक फंड, भू-अवकाशीय मोहीम (जिओस्पेशिअल मिशन) आणि अणुऊर्जा मोहीम (न्यूक्लियर एनर्जी मिशन) ही अशीच महत्वाची पावले आहेत. मी सर्व देशवासियांचे या ऐतिहासिक अर्थसंकल्पासाठी अभिनंदन करतो.
>
> **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

मोदी यांनी ७४व्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यात लाल किल्ल्याच्या तटबंदीवरुन देखील हेच सांगितले होते की, मध्यमवर्गातून पुढे आलेले व्यावसायिक आज जगभरात भारताचे नाव उज्ज्वल करत आहेत. मध्यमवर्गातून आलेले डॉक्टर्स, इंजिनीअर्स, वकील, शास्त्रज्ञ हे सर्वजण जगभरात आपला ठसा उमटवत आहेत. मध्यमवर्गीयांना जितक्या संधी मिळतात, त्या सर्व संधीचे सोने करत ते कित्येक पटींनी उसळी घेतात या पंतप्रधानांच्या विधानाशी कोणतेही दुमत नाही. यासाठीच मध्यमवर्गीयांच्या आयुष्यात सरकारी हस्तक्षेप असता कामा नये, मध्यमवर्गाला नवनवीन संधी तसेच खुले आकाश हवे.

खरे तर, याआधी एक असा काळ होता की मध्यमवर्गीय माणसांच्या मनात सुरक्षेची भावना नव्हती. मग ती आर्थिक सुरक्षा असो की इतर कोणतीही. मात्र आज ते अशा युगात आहेत जिथे त्यांच्यासाठी अनेक सुविधा उपलब्ध आहेत. अशा स्थितीत भारताचा मध्यमवर्ग आणि त्याच्या आकांक्षा मोठ्या प्रमाणात बळकट झाल्या आहेत. स्वतःचे हक्काचे घर असावे या स्वप्नापासून ते उत्पन्न वाढीपर्यंत सर्व स्तरावर सामर्थ्य प्रदान करणाऱ्या योजनांपासून ते समाजविघातक शक्तींना शिक्षा देऊन सुरक्षेची भावना निर्माण करण्यापर्यंत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारत समृद्ध होत आहे. अनेक सरकारी उपक्रमांचा मध्यमवर्गीय कुटुंबांवर लक्षणीय प्रभाव पडला आहे. ज्या मध्यमवर्गीयांना दीर्घकाळ संपूर्णपणे नाकारले होते, त्यांच्या क्षमतेला पहिल्यांदाच देशाचे राजकारण आणि सर्वोच्च नेतृत्वाने नवीन ओळख मिळवून दिली आहे. गरिबी हटवण्याची आणि मध्यमवर्गीयांवर सतत लादले जाणारे ओझे कमी करण्याची त्यांची दृष्टी आणि धोरणेही व्यावहारिक आहेत.

याची आवश्यकता केवळ एका समतोल व आदर्श समाजाच्या निर्मितीसाठीच आहे असे नाही तर, ती काळाची गरज आहे. या वर्गाच्या उपेक्षेचे दाट ढग विरून जाताना दिसत आहेत. या आदर्श स्थितीच्या दिशेने पाऊल टाकत २०४७ चे स्वर्णिमस्वप्न साकार करणाऱ्या 'नव भारता'चे संकेत देत आहेत. एकंदर पाहता मध्यमवर्गाच्या आवश्यकता लक्षात घेऊन प्रत्येक क्षेत्रात दिलासा देण्याचा प्रयत्न केंद्र सरकारने केला आहे. मध्यमवर्गीयांच्या खिशात जास्तीत जास्त पैसे कसे राहतील, याचा प्रयत्न केलेला दिसत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारत सरकार सक्रियपणे मध्यमवर्गीयांच्या समस्यांवर उपाय शोधत आहे. केंद्र सरकारने त्यांच्या आशा आकांक्षा व गरजा लक्षात घेतल्या आहेतच, शिवाय त्यांचे जीवन अधिक सुखकर व्हावे, यादृष्टीने निरनिराळ्या उपायांवर निरंतर कार्य करत आहे; ज्यामुळे त्यांना त्यांच्या आकांक्षांना नवीन उड्डाण देण्याची व स्वर्णिम वर्षातील सक्षम, शक्तिशाली, समृद्ध, विकसित भारताचे सारथ्य करण्याची संधी मिळेल.

### सर्वसाधारण अर्थसंकल्प देशाच्या आशा व आकांशा पूर्ण करत आहे

एक काळ असा होता जेव्हा सर्वसाधारण अर्थसंकल्प हा केवळ वर्षाचा लेखाजोखा देणारा आर्थिक दस्तऐवज मानला जात असे. मात्र २०१४ पासून आर्थिक लेखाजोखा सादर करणे, ही केवळ घटनात्मक गरज नसून केंद्र




सरकारच्या दीर्घकालीन विचाराने ते सातत्यपूर्णतेचे दस्तऐवज बनले आहे. विकसित भारताचा संकल्पदेखील याच विचारधारेचा एक भाग आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळातील हा पहिला अर्थसंकल्प २०४७ च्या विकसित भारताच्या संकल्पाचा मार्ग प्रशस्त करणारा दस्तऐवज बनला आहे. यासाठी केंद्र सरकार मोहीम पातळीवर भौगोलिक–सामाजिक–आर्थिक अशा सर्वांगीण विकासाच्या दृढनिश्चयासह वाटचाल करत आहे. नवोन्मेष, सर्वसमावेशकता, गुंतवणूक हे सरकारच्या आर्थिक घडामोडींचा पथदर्शी मूलाधार आहेत. त्यामुळे यावेळचा सर्वसाधारण अर्थसंकल्प विकसित भारताच्या या पाच आकांक्षांवर आधारित आहे. पहिले– वाढीचा वेग वाढवणे, दुसरे– सर्वसमावेशक वाढ सुनिश्चित करणे, तिसरे– खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकीला नवीन संजीवनी देणे, चौथे– कुटुंबांचे मनोबल वाढवणे, पाचवे– भारताच्या वाढत्या मध्यमवर्गाची क्रयशक्ती वाढवणे.

आणि म्हणूनच केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात तेलुगू कवी व नाटककार गुराजादा अप्पा राव यांच्या काव्यपंक्ती सादर केल्या ज्याचा अर्थ 'देशाची ओळख तेथील मातीमुळे नाही, तर तेथील लोकांमुळे आहे', असा आहे. या ओळींशी सुसंगत अशा विकसित भारताच्या उद्दिष्टामध्ये गरिबीपासून मुक्ती, शंभर टक्के चांगल्या दर्जाचे शालेय शिक्षण, उच्च–गुणवत्तेची, परवडणारी व सर्वसमावेशक आरोग्यसेवेची उपलब्धता, अर्थपूर्ण रोजगारासह शंभर टक्के कुशल कामगार, आर्थिक उपक्रमांमध्ये सत्तर टक्के महिला, आपल्या देशाला 'जगाचे अन्नकोठार'बनवणारे शेतकरी यांचा समावेश आहे. या अर्थसंकल्पात, गरीब, तरुण, शेतकरी व महिलांना प्राधान्य देऊन विकासासाठीचे प्रस्तावित उपाय दहा व्यापक क्षेत्रांमध्ये विस्तारले आहेत.

ही दहा व्यापक क्षेत्र म्हणजे– पहिले– कृषी विकास व उत्पादकतेला गतिमान करणे, दुसरे– ग्रामीण समृद्धी व अनुकूल वातावरण निर्मिती, तिसरे– सर्वसमावेशक प्रगतीच्या मार्गावर सर्वांना सोबत घेऊन जाणे, चौथे– भारतातील एकंदर उत्पादन वाढवणे व मेक इन इंडिया उपक्रमाला चालना देणे, पाचवे– एमएसएमईंना पाठिंबा देणे, सहावे– रोजगाराच्या माध्यमातून विकासाचा मार्ग मजबूत करणे, सातवे– जनता, अर्थव्यवस्था व नवोन्मेषामध्ये गुंतवणूक करणे, आठवे– ऊर्जा पुरवठा खात्रीशीर करणे, नववे– निर्यातीला चालना देणे, दहावे– नवकल्पनांना प्रोत्साहन देणे. या पथदर्शी आराखड्यासह केंद्र सरकारचा हा सर्वसाधारण अर्थसंकल्प वर्तमानातल्या आवश्यकतांच्या पूर्ततेसह भविष्यासाठी सज्जतेच्या दृष्टीने तयार करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शब्दात मांडायचे झाले तर, हा अर्थसंकल्प जनता जनार्दनाचा अर्थसंकल्प बनला आहे. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी केलेल्या घोषणा, कृषी क्षेत्र व संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेतील नवीन क्रांतीचा आधार बनेल. पीएम धन–धान्य कृषी योजनेंतर्गत, १०० जिल्ह्यांमध्ये सिंचन व पायाभूत सुविधा विकसित केल्या जातील, किसान क्रेडिट कार्डाची मर्यादा ५ लाख रुपयांपर्यंत केल्यामुळे त्यांना अधिक मदत मिळेल.

## भारताच्या नवनिर्मितीच्या ९ मोहिमा

भारताच्या लोकशाहीकरता अठरावी लोकसभा एक ऐतिहासिक व महत्वपूर्ण टप्पा ठरला आहे. सुमारे ६० वर्षांनंतर एखादे सरकार सलग तिसऱ्यांदा निवडून आले आहे, तसेच तिसऱ्या कार्यकाळातील पहिला संपूर्ण अर्थसंकल्प सादर करण्याचे भाग्य या सरकारला लाभले, याकडे भारताच्या लोकशाहीच्या गौरवशाली वाटचालीतील एक अतिशय प्रतिष्ठेची घटना म्हणून देश पाहत आहे. लोकांच्या या विश्वासाच्या बळावर केंद्र सरकार अनेक धाडसी विकासकार्यांना गती देत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारमध्ये निर्धारीत वेळेत उद्दिष्टांच्या पूर्ततेला अतिशय महत्वपूर्ण मानले जाते.याच विचारसरणीला पुढे नेत यंदाच्या अर्थसंकल्पात 'जल जीवन मिशन' समवेत इतर ९ मोहिमांची घोषणा करण्यात आली आहे. डाळींच्या बाबतीत आत्मनिर्भरता यावी याकरता ६ वर्षांची मोहीम सुरु केली जाणार आहे. **(पूर्वार्ध)**

# भारताच्या संरक्षण क्रांतीची झेप



संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर होणारा भारत, सैन्य दलांमधल्या आत्मविश्वासाचीही हमी आहे. युद्ध काळात, आपण जी शस्त्रात्रे वापरत आहोत ती स्वदेशी आहेत आणि ती कधी कमी पडणार नाहीत हे सैन्याला माहित असते तेव्हा त्यांच्यात नवा संचार होतो. गेल्या १० वर्षात भारताने आपली लढाऊ विमान तयार केले आहे. भारताने आपले विमान तयार केले आहे.

**सी–२९५** मालवाहू विमान भारतात तयार केले जात आहे. आधुनिक इंजिनाची निर्मिती देखील भारतात होणार आहे. काही दिवसांपूर्वीच केंद्रीय मंत्रिमंडळाने एक मोठा निर्णय घेतला आहे की आता ५व्या पिढीतील लढाऊ विमानांची रचना, विकास आणि उत्पादुन देखील भारतात होईल. यामुळे भविष्यात भारताचे सैन्य आणि भारताचे संरक्षण क्षेत्र यांची व्याप्ती वाढणार आहे. यामुळे युवा वर्गासाठी रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. एकेकाळी भारत जगातील सर्वात मोठा संरक्षण आयातदार होता. आता भारतया क्षेत्रातील देखील एक मोठा निर्यातदार बनू लागला आहे. आज भारताची संरक्षण निर्यात २०१४ च्या तुलनेत ८ पटीपेक्षा जास्त झाली आहे.

### 'संपूर्ण राष्ट्र' दृष्टीकोनातून राष्ट्र रक्षण

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार एक मजबूत, सुरक्षित, आत्मनिर्भर आणि समावेशक भारताचा दृष्टीकोन साकार करत आहे. विक्रमी संरक्षण निर्यात, सार्वकालिक उत्पादन आणि सकारात्मक स्वदेशीकरण यादीत वस्तूंच्या संख्येतील वाढ भारताला जागतिक उत्पादन केंद्र बनवण्याच्या सरकारच्या अतूट वचनबद्धतेचा दाखला आहे. जगातील सर्वात उंच युद्धमैदानातील तैनातीपासून लढाऊ युनिट आणि नौदलाच्या लढाऊ जहाजांची धुरा सांभाळण्यापर्यंत महिला शक्तीने सैन्य कुशलतेचा एक नवा मापदंड प्रस्थापित केला आहे. आजचा भारत साहसी आणि मजब्त आहे, सशस्त्र दल देशाचे सार्वभीमत्व, एकता आणि अखंडता यांची हानी करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना चोख प्रत्युत्तर देत असते. आपल्या शूर सैनिकांचा देशाला अभिमान आहे जे निःस्वार्थ भावनेने मातृभूमीची सेवा करतात. सर्वच क्षेत्रात महिलांचा वाढणारा सहभाग, देशाच्या संरक्षण क्षेत्रातही दिसू लागला आहे. महिला केवळ देशाच्या प्रगतीतच योगदान देत नाहीत तर नेतृत्वाची जबाबदारीदेखील पेलत आहेत. पंतप्रधान मोदी सांगतात, लष्कर असो, नौदल असो, हवाई दल असो किंवा अंतराळ क्षेत्र असो, आपण आपल्या देशातील सातत्याने वाढणाऱ्या महिला शक्तीच्या प्रगतीचे साक्षीदार बनत आहोत. खरेतर स्वातंत्र्यानंतर दुर्दैवाने एका दशकापर्यंत देशाच्या सुरक्षेविषयी त्या प्रकारचे गांभीर्य दाखवण्यात आले नाही, ज्याची आवश्यकता होती. स्वातंत्र्यानंतर देशातील पहिला घोटाळादेखील संरक्षण खरेदीमध्ये झाला होता. असे वाटू लागले होते की जणू काही जाणून बुजून संरक्षणाच्या गरजांसाठी परदेशांवर अवलंबून ठेवले जात आहे. म्हणूनच २०१४च्या आधीच्या परिस्थितीच्या चर्चेची आठवण केली तर असे दिसते की तेव्हा संरक्षण खरेदी व्यवहारातील घोटाळ्यांची चर्चा

व्हायची. लष्कराकडे केवळ इतक्या दिवसांचाच दारुगोळा शिल्लक आहे, अशा चिंता समोर यायच्या. दारुगोळा कारखाने वाया जात होते. स्वातंत्र्यानंतर देशात १८ आयुध कारखाने होते तर देशात तोफखान्याच्या तोफांसहित अनेक प्रकारची लष्करी सामग्री तयार केली जात होती. दुसऱ्या महायुद्धात भारत एक महत्त्वाचा संरक्षण सामग्री पुरवठादार होता. आता याच दारुगोळा कारखान्यांना जीवदान मिळाले आहे आणि त्यांचे रुपांतर ७ बड्या कंपन्यांमध्ये करण्यात आले आहे. एचएएल उदध्वस्त होण्याच्या मार्गावर होती पण आज तीच एचएएल विक्रमी नफा मिळवणाऱ्या कंपन्यांमध्ये रुपांतरित झाली आहे. कारगील युद्धानंतर प्रदीर्घ काळ सीडीएससारख्या पदाची निर्मिती झाली नव्हती. मात्र, विद्यमान सरकारने हे शक्य करून दाखवले. अनेक दशके आपल्या वीर हुतात्मा सैनिकांसाठी एक राष्ट्रीय स्मारक देखील बनवू शकले नाहीत, जे विद्यमान सरकारने साकार करून दाखवले. पूर्वी सीमांवर आधुनिक पायाभूत सुविधा तयार करणे टाळले जात होते पण आज एकापेक्षा एक अत्याधुनिक मार्ग, आधुनिक बोगदे, आपल्या सीमावर्ती भागात तयार होत आहेत.

इतकेच नव्हे, माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी चार दशकांपासून प्रलंबित वन रँक वन पेन्शनचा विषय देखील साकार करून दाखवला. आत्मनिर्भर संरक्षण प्रणाली अर्थव्यवस्थेकरिता आणि संरक्षण धोरणात्मकतेच्या दृष्टीने देखील महत्त्वाची आहे. देशाने २०१४ नंतर परदेशी अवलंबित्व कमी करण्यासाठी एका मोहिमेच्या स्वरुपात काम केले आहे.

गेल्या दशकातील दृष्टीकोनापासून धडा घेत आज आपल्या सर्वांच्या प्रयत्नांच्या सामर्थ्याने एक नवे संरक्षण पारिस्थितिकी तंत्र विकसित करत आहोत. आज संरक्षण संशोधन आणि विकास खाजगी क्षेत्र, शिक्षणतज्ञ, एमएसएमई आणि स्टार्ट-अप्ससाठी खुले करण्यात आले आहे. यामुळे प्रदीर्घ काळ प्रलंबित संरक्षण प्रकल्पांना नवी गती प्राप्त झाली आहे.

पंतप्रधान मोदी यांचे असे सांगणे आहे की आता राष्ट्रीय सुरक्षेला असणाऱ्या धोक्यांच्या व्याप्तीत देखील वाढ झाली आहे, युद्धाचे स्वरुप बदलू लागले आहे. पूर्वी आपण केवळ जमीन, समुद्र आणि आकाशापर्यंत आपल्या संरक्षणाची कल्पना करत होतो. आता हे चक्र अंतराळाच्या दिशेने वाढत आहे, सायबर स्पेसच्या दिशेने वाढत आहे, आर्थिक, सामाजिक अंतरिक्षाच्या दिशेने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान म्हणाले की, आपल्याला भविष्यातील आव्हानांचा विचार करुन पुढे गेले पाहिजे आणि त्यानुसार स्वतःमध्ये बदल घडवले पाहिजेत. त्यांनी सांगितले की या संदर्भात आत्मनिर्भरतेने देशाला खूप मोठ्या प्रमाणात मदत होईल.

ज्या प्रकारे आत्मनिर्भर भारतासाठी संपूर्ण सरकार दृष्टीकोनाने देश पुढे जात आहे, त्याच प्रकारे संपूर्ण राष्ट्र' हा दृष्टीकोन देशाच्या संरक्षणासाठी काळाची गरज आहे. भारतातील विविध लोकांच्या सामूहिक राष्ट्रीय चेतना सुरक्षा आणि समृद्धीचा मजबूत आधार आहे.

### देवदुताच्या भूमिकेत सदैव सैन्यदले

उत्तराखंडच्या उत्तरकाशी जिल्ह्यात बांधकाम सुरू असलेल्या सिलक्यारा बोगद्याचा एक भाग १२ नोव्हेंबर २०२३ रोजी कोसळला ज्यामुळे ४१ कामगार आतमध्ये अडकले. १५ नोव्हेंबर २०२३ रोजी भारतीय हवाई दलाने २७.५ टन वजनाची महत्त्वाची जड उपकरणे, बचाव लोड आणि विशेषज्ञांना एएलजी एयरलिफ्ट करण्यासाठी तीन सी-१३० विमाने तैनात करण्यात आली. हे लँडिंग ग्राऊंड २०१३ पासून वापरातच नव्हते.

१७ ते २७ नोव्हेंबर २०२३ दरम्यान इंदूरहून अवजड आगर मशीन, पुण्यावरून डीआरडीओ रोबो आणि मुंबईहून ड्रील बिट आणि मेटल वायर लोड डेहराडून येथे आणण्यात आले. २९ नोव्हेंबर २०२३ रोजी बचाव करण्यात आलेल्या सर्व ४१ कामगारांना एम्स क्रषीकेश येथे पोहोचवण्यात आले. अतिशय कमी वेळात दाखल झालेल्या सी-१३०, सी-१७, डॉर्नियर, एएन-३२ आणि चिनुक हेलिकॉप्टकर यांनी आपापले काम यशस्वीरित्या पूर्ण केले.

भारतीय हवाई दलाच्या विमानांनी १०४ टन वजनाच्या सामग्रीची ने-आण करत ७९ तासांपेक्षा जास्त काळ काम केले. याच प्रकारे राष्ट्रनिर्मिती आणि अंतर्गत सुरक्षेमध्ये लष्कराची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. पूर किंवा इतर प्रकारच्या आपत्तींमध्ये लष्कर नेहमीच देवदुताच्या रुपात समोर येत असते. आपल्या जवानांनी प्रत्येक कठिणात कठीण प्रसंगात आपले सामर्थ्य सिद्ध केले आहे.

**(पूर्वार्ध)**

# स्टार्टअप बनतोय नवीन भारत

> भारताच्या युवा शक्तीचे सामर्थ्य आज संपूर्ण जग पहात आहे. याच सामर्थ्यावर विश्वास ठेवत देशाने स्टार्टअप परिसंस्था तयार करण्यासाठी अनेक पाऊले उचलली आहेत. सुरवातीला या प्रयत्नावर विश्वास ठेवणारे फार कमी होते. आपल्याकडे शिक्षण म्हणजे नोकरी आणि नोकरी म्हणजे केवळ सरकारी नोकरी असा होता. आज ही मानसिकता बदलली आहे. एखाद्याने व्यवसायाचा विचार केला तर कल्पनेची नव्हे तर सुरवातीसाठीच्या पैशांची चिंता असे. ज्याच्याकडे पैसा आहे तोच व्यवसाय करू शकतो, अशी धारणा होती.

**स्टार्ट अप** परीसंस्थेने, या अडथळा ठरू शकणाऱ्या मानसिकतेला छेद दिला आहे. देशाच्या युवकांनी नोकरी मागणाऱ्यांऐवजी नोकरी देणारे बनण्याचा मार्ग निवडला आहे. आज भारत जगातली सर्वात मोठी तिसरी स्टार्टअप परिसंस्था आहे आणि याच्याशी सुमारे १२-१३ लाख युवक थेट जोडले गेले आहेत. स्टार्टअपने सुमारे १२ हजार पेटंट फाईल केले आहेत. इतकेच नव्हे देशाने स्टार्टअपसाठी कसा सहयोग केला आहे, त्याचे एक आणखी उदाहरण आहे सरकारी ई-बाजार (GeM) पोर्टल. प्रत्येक प्रकारच्या सरकारी खरेदी-विक्रीसाठी तयार करण्यात आलेल्या या पोर्टलवर स्टार्टअपसाठी काही विशेष सवलती देण्यात आल्या आहेत. परिणामी विविध स्टार्टअपनी इथे ३२ कोटी पेक्षा जास्त उलाढाल केली आहे. आजचा युवक आता डॉक्टर, इंजिनियर बरोबरच नवोन्मेशक बनण्याचे स्वप्न, आपला स्टार्टअप उभा करण्याचे स्वप्नही पाहू लागला आहे. युवा वर्गाकडे




जी प्रतिभा आहे किंवा त्यांचे जे प्रशिक्षण आहे, स्टार्टअपच्या माध्यमातून ते नव्या क्षेत्रात प्रवेश करत आहेत. एक प्रकारे, काही वर्षाआधी देशाने धोरण मंचावर जे स्टार्टअप आणले होते, ते स्टार्टअप आता नवी शिखरे गाठत आहेत. इतकेच नव्हे ४८ टक्क्यापेक्षा जास्त स्टार्टअप असे आहेत, ज्यामध्ये किमान एक महिला संचालक आहे.

२१व्या शतकात देशाला पुढे नेण्यामध्ये युवा शक्ती महत्वाची आहे. आज भारताच्या छोट्या-छोट्या शहरांमध्ये लोक ज्या प्रकारे स्टार्टअप सुरु करत आहेत ते नव्या पिढीसाठी आकर्षण आणि आत्मविश्वासाचे केंद्र बनले आहेत. स्टार्टअपच्या यशाने युवा शक्तीच्या सामर्थ्याची जगभरात ओळख निर्माण झाली आहे. स्टार्टअपपासून ते स्वयं रोजगार आणि अंतराळापासून ते ड्रोनपर्यत आज भारताच्या युवकांसाठी चहुबाजूनी नव्या संधी निर्माण होत आहेत. केंद्र सरकारचा औद्योगिक धोरण आणि प्रोत्साहन विभाग (डीआयपीपी) अनुसार, स्टार्टअप अशी कंपनी आहे जिची भारतात ५ वर्षांमध्ये नोंदणी झाली आहे. ज्या कंपनीची उलाढाल एका वित्त वर्षात १०० कोटी पेक्षा जास्त नाही. ही कंपनी नवोन्मेश, विकास, नव्या उत्पादनाचे व्यावसायीकरण, तंत्रज्ञान आधारित सेवा किवा बौद्धिक संपदेच्या दिशेने काम करत असावी, अशी अपेक्षा केली जाते.

गेल्या १० वर्षात देशात जे परिवर्तन घडले आहे, त्यामुळे भारताच्या नागरिकांमध्ये जोखीम घेण्याच्या संस्कृतीला पुन्हा नवी उर्जा मिळाली आहे. आज देशाचा युवक प्रत्येक क्षेत्रात जोखीम घेणारा म्हणून पुढे येत आहे.

२०१४ मध्ये आयुषशी जोडलेले उत्पादन क्षेत्र ३ अब्ज डॉलर्सचे होते, ज्यात वाढ होऊन ते सुमारे २४ अब्ज डॉलर्स झाले आहे. म्हणजेच १० वर्षात ८ पट वृद्धी झाली आहे. म्हणूनच आज देशाचा युवा नव-नवे आयुष स्टार्टअप सुरु करत आहे. पारंपारिक उत्पादने आणि तंत्रज्ञान याच्याशी संबंधित १,२५० पेक्षा जास्त आयुष स्टार्टअप आज देशात काम करत आहेत. भारत आता १५० देशांमध्ये अब्जावधी डॉलर्सची आयुष उत्पादने निर्यात करत आहे. प्रत्येक क्षेत्राच्या उद्योगांना प्रोत्साहन मिळत आहे, यातून वेगवेगळ्या क्षेत्रातील युवकांसाठी नव्या संधी निर्माण होत आहेत. देशात मोठी गुंतवणूक होत आहे आणि विक्रमी संधी उपलब्ध होत आहेत. संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरता उपक्रमाने नवी उर्जा आणली आहे. १)१७९ म्हणजे संरक्षण सर्वोत्कृष्टतेसाठी नवोन्मेश यासारख्या योजनांनी, स्टार्टअपना वेग दिला आहे आणि गेल्या ५-६ वर्षातच भारतात संरक्षण क्षेत्राशी निगडीत १००० नवे संरक्षण स्टार्ट अप बनले आहेत. गेल्या १० वर्षात भारताच्या संरक्षण निर्यातीत ३० पट वाढ झाली आहे.

भारत जगातल्या सर्वात युवा देशांपैकी एक आहे. या युवा देशाचे सामर्थ्य गगनाला गवसणी घालण्याचे आहे. यासाठी केंद्र सरकार झपाट्याने काम करत आहे. भारताची मानसिकता आणि दृष्टिकोनात परिवर्तन आले आहे. २०४७ पर्यंत विकसित भारताचा संकल्प हाच दृष्टिकोन दर्शवतो. स्टार्ट अप सारखी क्रांती, जनशक्तीमधून राष्ट्र शक्ती घडवण्याचे सर्वात मोठे उदाहरण आहे. उत्पादन आणि ओद्योगिक प्रक्रियेत डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित औद्योगिक क्रांती ४.० लक्षात घेत आज देश कौशल्य विकास आणि रोजगारावर मोठ्या प्रमाणात लक्ष केंद्रित करत आहे. यामधे मुद्रा योजना, स्टार्ट अप इंडिया, स्टँड अप इंडिया यासारखे उपक्रम युवकांना मोठी मदत करत आहेत. मुद्रा योजनेतून सहाय्य घेत ८ कोटी पेक्षा जास्त लोकांनी प्रथमच आपला व्यवसाय सुरू केला. देशात आज सुमारे १ लाख ५४ हजार पेक्षा जास्त स्टार्टअप आहेत. यामधे लाखो युवक काम करत आहेत.

केंद्र सरकारच्या प्रयत्नातून गेल्या १० वर्षात भारताची डिजिटल अर्थव्यवस्था, युवा शक्तीची नवी ताकद आणि नवी ओळख बनली आहे. भारत अग्रगण्य डिजिटल अर्थव्यवस्था बनू शकतो. स्टार्टअप इंडियाने मोठ्या संख्येने युवकांना रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. या स्टार्टअपपैकी बहुतांश स्टार्टअपना डिजिटल इंडियाचा थेट लाभ मिळत आहे.

अंतराळ क्षेत्रात काम करणाऱ्या स्टार्ट अपची संख्या १ वरून वाढून २६६ झाली आहे. किती अमाप संधी भारताची प्रतीक्षा करत आहेत याची कल्पना आपण करू शकता. नवोन्मेशाची ही संस्कृती विकसित भारत घडवण्यासाठीच नव्हे तर संपूर्ण जगाच्या उज्वल भविष्यासाठीही आवश्यक आहे. जी-२० अध्यक्षतेच्या काळात भारताने आपला हा दृष्टीकोन स्पष्ट केला आहे.

भारताने स्टार्टअप-२० अंतर्गत जगभरातल्या स्टार्टअप परीसंस्थेला एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आहे. काम करत आहे अशा काळात स्टार्टअपचे महत्व वाढते. गेल्या दशकामध्ये जगाने पाहिले आहे की भारताने माहिती तंत्रज्ञान आणि सॉफ्टवेअर क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. आता भारतात नवोन्मेश आणि स्टार्टअप संस्कृतीचा कल सातत्याने वाढत आहे.

भारत सरकार युवकांच्या भविष्याला आज सर्वाधिक प्राधान्य देत आहे. आज भारत अमृत काळाबाबत बोलत असताना त्यामध्ये भारताच्या युवकांचे सामर्थ्य प्रतिबिंबित होते. काही शेकड्या पासून दशकभरात दीड लाख स्टार्टअपपर्यंतचा प्रवास युवकांचे हे सामर्थ्य दर्शवत आहे. युवकांनी युनिकॉर्नचे शतक केले आहे.

युनिकॉर्न अशी कंपनी असते जिचे मूल्य १ अब्ज डॉलर म्हणजे ८ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त असते. केंद्र सरकार स्टार्ट अप परीसंस्था केंद्र सरकार स्टार्टअप परिसंस्थेला धोरणात्मक सहकार्य करत आहे. प्रत्येक आव्हानाचा सामना करू इच्छिणाऱ्या तरुणांच्या पाठीशी त्यांचे सरकार उभे असल्याचा उल्लेख पंतप्रधान मोदी नेहमी करतात.

भविष्यासाठी देशातील लाखो तरुण नवोदितांना घडवण्याचे कार्य निरंतर सुरू आहे. आज देशभरात १० हजारांहून अधिक अटल टिंकरिंग लॅब आहेत. यामध्ये आता ७५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञान, अभिनव आणि नवीन संधींचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. यामुळे त्यांची उत्सुकता आणखी वाढते आणि उत्तम स्टार्टअप कल्पना घेऊन आलेल्या तरुणांना पूर्ण पाठिंबा दिला जातो. एक प्रकारे हे स्टार्टअप नर्सरीसारखे आहे. यामुळे भारतात नवनिर्मितीची नवीन लाट निर्माण होईल. ■

# मोदी सरकारच्या काळात खादीला मिळाली झळाळी




**खादी** ग्रामोद्योगच्या व्यवसायाने प्रथमच १.५ लाख कोटींचा टप्पा ओलांडला असल्याची माहितीही पंतप्रधानांनी काही महिन्यांपूर्वी आपल्या मन की बात यां कार्यक्रमात बोलताना दिली होती. यापूर्वी जे लोक खादी वापरण्यास इच्छुक नव्हते ते आता अभिमानाने ही उत्पादने वापरत आहेत. खादी ग्रामोद्योगच्या व्यवसायाने प्रथमच १.५ लाख कोटींचा टप्पा ओलांडला आहे? खादीची विक्री किती वाढली आहे हे तुम्हाला माहित आहे का? चारशे टक्के. वाढत्या विक्रीमुळे मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या नवीन संधी वाढत आहेत. या उद्योगात बहुसंख्य महिला असल्याने त्यांना सर्वाधिक फायदा होत आहे,'' असे पंतप्रधानांनी या कार्यक्रमात सांगितले होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात 'हर घर तिरंगा' अभियानामुळे खादीच्या राष्ट्रीय ध्वजांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. असे केव्हीआयसीचे अध्यक्ष मनोज कुमार यांनी म्हटले आहे. 'हर घर तिरंगा अभियान' दरम्यान खादीच्या राष्ट्रीय ध्वजांची विक्री ११०१ टक्क्यांनी वाढली आहे. २०१३-१४ मध्ये देशात खादीच्या राष्ट्रीय ध्वजांची विक्री फक्त ८७ लाख रुपये होती. तर वर्ष २०२३-२४ मध्ये ती वाढून १०.४५ कोटी रुपये झाली आहे. मागील तीन वर्षांत, तिरंगा यात्रा सुरू झाल्यापासून, खादीच्या राष्ट्रीय ध्वजांची एकूण विक्री ३३ कोटी रुपये ओलांडली आहे. या विक्रीचा थेट लाभ खादी कारीगरांना अतिरिक्त पारिश्रमिक स्वरूपात होतो. ज्यामुळे तिरंगा यात्रा खादी जगाला सर्वाधिक लाभ झाला आहे

२०१३-१४ या आर्थिक वर्षात खादी आणि ग्रामोद्योग उत्पादनांचा व्यवसाय सुमारे एकतीस हजार कोटी रुपयांचा होता. २०२२-२३ मध्ये तोच व्यवसाय एक लाख चौतीस हजार ६३० कोटी रुपयांपर्यंत वाढला. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वतः खादी आणि संबंधित उत्पादनांचे मोठे ब्रँड अम्बेसेडर आहेत. खादीच्या प्रचारासाठी ते सातत्याने आग्रही असतात. परिणामी, 'खादी ग्रामोद्योग विकास महामंडळा'च्या उत्पादनांचा व्यवसाय प्रथमच एक लाख ३४ हजार कोटी रुपयांच्या पुढे गेला आहे. खादी ग्रामोद्योग विकास महामंडळाने ग्रामीण भागात नोकरीच्या नऊ लाख ५४ हजार ८९९ संधी निर्माण केल्या आहेत. पंतप्रधान मोदी यांनी देश-विदेशातील प्रत्येक व्यासपीठावरून खादीचा प्रचार केला. त्यामुळेच खादी आणि संबंधित उत्पादने लोकप्रियतेच्या नवीन शिखरावर पोहोचली, असे खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचे अध्यक्ष मनोजकुमार म्हणाले. जगातील सर्वात विश्वासार्ह ब्रँडमध्ये खादी उत्पादनांची गणना केली जाते. २०१३-१४ ते २०२२-२३ या नऊ आर्थिक वर्षांमध्ये खादी आणि ग्रामोद्योग उत्पादनांच्या विक्रीमध्ये ३३२ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. यावरून, स्थानिक आणि स्वदेशी उत्पादनांसाठी आवाज उठवणाऱ्या 'मेक इन इंडिया' मोहिमेवर असणारा नागरिकांचा विश्वास वाढल्याचे दिसून येते. परिणामी, २०१३-१४ या आर्थिक वर्षात खादी आणि संबंधित वस्तूंचे सुमारे २६ हजार कोटी रुपये असलेले उत्पादन २०२२-२३ या आर्थिक वर्षात २६८ टक्के वाढीसह ९५ हजार ९५७ कोटी रुपयांवर पोहोचले. गेल्या नऊ वर्षांमध्ये खादी कापडाच्या उत्पादनात २६० टक्क्यांनी वाढ झाली आहे. गेल्या १० वर्षांत खादी कापडांच्या उत्पादनातही अभूतपूर्व वाढ झाली आहे. २०१३-१४ या आर्थिक वर्षात खादी कापडांचे उत्पादन ८११.०८ कोटी रुपये होते, तर २०२३-२४ या आर्थिक वर्षात ते २९५.२८ टक्क्यांनी वाढून ३,२०६ कोटी रुपयांवर पोहोचले. ■

# पीएम सूर्यघर : मोफत वीज योजनेने ओलांडला १० लाख जोडण्यांचा टप्पा

**पीएम सूर्यघर:** मोफत वीज योजना या घराच्या छतावरील सौर ऊर्जा निर्मितीच्या जगातील सर्वात मोठ्या उपक्रमाने १० मार्च २०२५ पर्यंत देशभरात १०.०९ लाख जोडण्यांचा एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १३ फेब्रुवारी २०२४ रोजी या महत्वाकांक्षी योजनेचा प्रारंभ करण्यात आला. घराच्या छतावरील सौर प्रकल्पांद्वारे देशभरातील १ कोटी निवासी कुटुंबांना मोफत वीज पुरवणे आणि पारंपरिक ऊर्जा स्रोतांवरील अवलंबित्व कमी करून सामान्य नागरिकांना वीज उत्पादक बनवणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

या योजनेमुळे प्रत्येक कुटुंबाला १०० रोपांची लागवड केल्यानंतर जितके कार्बन उत्सर्जन कमी होईल तितके हवामान बदलाच्या धोक्याचे निवारण करण्याइतके योगदान लाभेल. नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने राबवलेल्या या योजनेसाठी ४७.३ लाख अर्ज प्राप्त झाले आहेत. तर ६.१३ लाख लाभार्थ्यांना ४,७७० कोटी रुपयांचे अनुदान यशस्वीरित्या मिळाले आहे. पूर्णपणे स्वयंचलित प्रक्रियेत www.pmsuryaghar.gov.in या संकेतस्थळाद्वारे अर्ज भरणे, विक्रेत्याची निवड इत्यादी प्रक्रिया केली जाते आणि १५ दिवसांच्या आत अर्जदारांच्या बँक खात्यात अनुदान जमा होते. या योजनेला अनेक राज्यांमध्ये लक्षणीय यश मिळाले आहे.

चंदीगड, दमण आणि दीव येथे सरकारी इमारतींच्या छतावरील १००% सौर उद्दिष्ट साध्य करण्यात आले आहे, स्वच्छ ऊर्जा स्वीकारण्यात देश आघाडीवर आहे. महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात आणि तामिळनाडूसारखी राज्ये देखील अपवादात्मकपणे चांगली कामगिरी करत आहेत, सौर पॅनल स्थापनेच्या एकूण आकडेवारीत त्यांचे योगदान लक्षणीय आहे. या योजनेची सुरळीत आणि वेळेवर अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकार, सर्व राज्यातील प्रगतीवर बारकाईनं लक्ष ठेवत आहे, वर्ष २०२६-२७ पर्यंत १ कोटी कुटुंबांपर्यंत ही योजना पोहोचवण्याचे उद्दिष्ट आहे. याशिवाय केंद्र सरकार सरकारी इमारतींवर सौर पॅनल बसवायला प्रोत्साहन देत आहे. ■

# ई-श्रम पोर्टल वर ३०.६८ कोटींहून अधिक असंघटित कामगारांची नोंदणी

**श्रम** व रोजगार मंत्रालयाने २६ ऑगस्ट २०२१ रोजी ई-श्रम पोर्टल (eshram.gov.in ) चा प्रारंभ केला होता. या पोर्टलद्वारे एक सर्वसमावेशक राष्ट्रीय असंघटित कामगार माहितीसाठा (NDUW) तयार करून त्याला आधारशी जोडणे हा त्यामागचा उद्देश होता. असंघटित कामगारांची ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करून त्यांना स्वयंघोषणेच्या आधाराने सार्वत्रिक खाते क्रमांक (UN) दिला जातो. ई-श्रम पोर्टल वरती ३ मार्च २०२५ पर्यंत ३०.६८ कोटीहून अधिक असंघटित कामगारांची नोंदणी झाली असून त्यापैकी निम्म्याहून जास्त (५३.६८%) महिला आहेत. ई-श्रम पोर्टलचा लाभ जास्तीत जास्त जनतेपर्यंत पोचवण्यासाठी श्रम व रोजगार मंत्रालयातर्फे ७ जानेवारी २०२५ ला भाषिणी व्यासपीठामार्फत हे पोर्टल विविध भाषांमधून वापरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेमुळे हे पोर्टल सर्वसमावेशक व सुलभ झाले असून आता कामगारांना २२ भारतीय भाषांमधून या पोर्टलचा वापर करता येईल. ई-श्रम व त्यासोबतच्या सर्व सेवांचा लाभ कामगारांना सहजपणे घेता यावा यासाठी श्रम व रोजगार मंत्रालयाने २४ फेब्रुवारी २०२५ रोजी ई-श्रम मोबाईल ॲपचा प्रारंभ केला आहे.

### असंघटित कामगारांमध्ये जागृती वाढवण्यासाठी मंत्रालयाने टाकलेली पावले

- राज्ये व केंद्रशासित प्रदेशांबरोबर नियमित आढावा बैठक घेणे.
- सामायिक सेवा केंद्रांबरोबर (CSC) नियमित बैठक.
- कौशल्यविकास व रोजगार संधी मिळवून देण्यासाठी ई-श्रम पोर्टलला राष्ट्रीय करियर सेवा व स्किल इंडिया डिजिटल पोर्टलशी जोडले आहे.
- निवृत्तीवेतन योजनांमध्ये सुलभतेने नोंदणी होण्यासाठी ई-श्रम पोर्टलला प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजनेशी (PMSYM²) जोडले आहे.
- सरकारच्या सर्व कल्याणकारी योजनांची माहिती एकाच ठिकाणी मिळण्यासाठी ई-श्रम पोर्टलला मायस्कीम पोर्टलशी जोडले आहे. ■

# बनावट जन्म प्रमाणपत्र घेऊन देशविरोधी कारवाया करणाऱ्या बांगलादेशी, रोहिंग्यांना रोखण्यासाठी महायुती सरकारचे दमदार पाऊल

## महाराष्ट्रात नवीन जन्म मृत्यू प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती लागू

**सार्वजनिक आरोग्य विभागाने शासन निर्णय १२ मार्च रोजी जारी केला असून, या आदेशाची अंमलबजावणी यंत्रणा महसूल विभाग असल्याने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधिमंडळात याबाबत निवेदन केले.**

● परकीय नागरिकांना बनावट जन्म प्रमाणपत्रे वितरित केल्याबाबत तक्रारी शासनास प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींच्या अनुषंगाने विशेष तपास समिती (SIT) गठीत केलेली होती.

● जन्म व मृत्यु प्रमाणपत्र एक वर्षानंतर देण्याच्या प्रक्रियेमध्ये पारदर्शकता, सुटसुटीतपणा व बनावट प्रमाणपत्रे वितरित करण्यास प्रतिबंध करण्याकरिता जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम,१९६९ व सुधारणा अधिनियम, २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यू नोंदीबाबतच्या कार्यपध्दतीसंदर्भात सर्वसमावेशक कार्यपध्दती निश्चित केलेली आहे. महाराष्ट्रासाठी हा ऐतिहासिक निर्णय आहे. जन्म मृत्यूच्या नोंदी घेण्याबाबतची प्रकरणे अर्ध- न्यायिक असल्याने अतिशय सूक्ष्म पद्धतीने हाताळायची आहेत.

● ज्यांचा जन्म अथवा मृत्यू होऊन एक वर्षांपेक्षा अधिक कालावधी झाला असेल व त्यांच्या संबंधितांना ही प्रमाणपत्रे पाहिजे असतील व त्याबाबतचे सबळ पुरावे नसतील अशा अर्जदाराविरुद्ध थेट फौजदारी कारवाई करणार.

● जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मधील तरतूदीनुसार तसेच महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम, २००० नुसार एका वर्षापेक्षा जास्त विलंबाच्या जन्म-मृत्यू नोंदी घेण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली.

● ज्या ठिकाणी जन्म झाला, त्या ठिकाणच्या नोंदी तपासून प्रमाणपत्र दिले जाईल. त्यासाठी ग्रामसेवक, जन्म मृत्यू निबंधक, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी यांनी कोणत्या पद्धतीने कामकाज करावे ही सांगणारी कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.

● नोंदी चुकीच्या आणि अर्जातील माहिती खोटी आढळली तर ग्रामसेवकापासून महापालिकेतील जन्म-मृत्यू निबंधकापर्यंत सर्वांना कारणासह जन्म-मृत्यू अनुपलब्धता प्रमाणपत्र द्यावे लागेल.

● संबंधित अर्जाची तपासणी पोलिस विभागामार्फत होईल. पोलिसांचा अभिप्राय बंधनकारक करण्यात आला आहे.

# विविध प्रमाणपत्रांसाठीची स्टॅम्प ड्यूटी रद्द

**महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा**

● जात पडताळणी प्रमाणपत्र ● उत्पन्नाचा दाखला
● रहिवासी प्रमाणपत्र ● नॉन क्रिमिलेयर सर्टिफिकेट
● राष्ट्रीयतत्व प्रमाणपत्रासह

● शासकीय कार्यालयात दाखल करायच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावे लागणारे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क (स्टॅम्प ड्यूटी) माफ

● यापुढे एका साध्या कागदावर स्वसाक्षांकित (सेल्फ अटेस्टेट) अर्ज लिहून प्रमाणपत्र तहसील कार्यालयातून मिळू शकेल.

● दहावी, बारावीच्या निकालानंतर विद्यार्थी व पालकांचा या सर्व प्रकारच्या प्रमाणपत्रासाठी लागणारा एकूण ३ ते ४ हजारांचा खर्च वाचणार.



भाजपा महिला मोर्चा कृतज्ञता सन्मान सोहळा– उपस्थिती– प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आ.रवींद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस ॲड.माधवी नाईक आ.संजय केळकर, आ.निरंजन डावखरे, महिला मोर्चाच्या प्रदेश अध्यक्ष आ. चित्रा वाघ, उपाध्यक्ष प्रा. वर्षा भोसले, उपाध्यक्ष मंगल वाघ, चिटणीस मृणाल पेंडसे, सचिव शिल्पा मराठे, ठाणे शहर जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, प्रदेश सचिव संदीप लेले आदी.




ठाणे– कर्तृत्ववान महिलांचा सत्कार– उपस्थिती– भाजपा प्रदेश सरचिटणीस ॲड. माधवी नाईक, आ. निरंजन डावखरे, शहर जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, ठाणे महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा स्नेहा पाटील, सरचिटणीस नीता पाटील आदी.



मिरा–भायंदर– बजेट पे बात युथ के साथ– उपस्थिती– युवा मोर्चा प्रदेश अध्यक्ष अनुप मोरे, निखिल चव्हाण, रवी तिवारी, पंकज पांडे, आदित्य दुबे, सागर रखवी, रणवीर वाजपेयी, विशाल पाटील, अमित रावल, राहुल यादव, विकास सिंग, प्रेम यादव आदी. या कार्यक्रमात सनदी लेखापाल (सीए) रमेश पांडे यांनी केंद्रीय अर्थसंकल्पातील विविध तरतुदींविषयी मार्गदर्शन केले.






नाशिक– बुद्धिजीवी प्रकोष्ठतर्फे कवि संमेलन– उपस्थिती– प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, प्रदेश सह मुख्य प्रवक्ते व प्रदेश बुद्धिजीवी प्रकोष्ठ संयोजक अजित चव्हाण, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, महानगराध्यक्ष प्रशांत जाधव, नाशिक महानगर बुद्धिजीवी प्रकोष्ठ संयोजक ॲड. श्रीधर व्यवहारे, प्रदेश प्रवक्ते प्रदीप पेशकर, गोविंद बोरसे, चंदन पवार, शशी जाधव, ॲड.अविनाश भिडे, प्र.द. कुलकर्णी, नंदकिशोर ठोंबरे, रोहन देशपांडे, रोहिणी नायडू, ॲड.श्याम बडोदे, सुनील केदार आदी.




नाशिक– अल्पसंख्याक महिला मोर्चातर्फे रमजाननिमित्त कार्यक्रम– उपस्थिती– अल्पसंख्याक महिला मोर्चा प्रदेश अध्यक्ष रिदा रशीद, हीना शेख, नाजिया शेख, रोझमीन पठाण, शबाना शेख, माधुरी गायकवाड, शबनम पठाण, शरयू डांगळे, नूरजहां शेख, कल्पना गायकवाड, राजश्री शिंदे, रिजवान सय्यद आदी.



वसई–विरार– रमजाननिमित्त कार्यक्रम– उपस्थिती– अध्यक्ष सकीना नुरानी, सरचिटणीस अब्दुल मोमीन, प्रभारी मुजफ्फर घनसर, उपाध्यक्ष सबीरअली मनिहार, मंडल अध्यक्ष रजब शेख आदी.



विदर्भातील शिक्षक महासंघाचे नेते चंद्रशेखर भोयर यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ज्येष्ठ नेते आ. संजय कुटे, आ. प्रवीण पोटे, आ. प्रवीण तायडे, आ. श्रीजया चव्हाण, आ. प्रतापदादा अडसड, आ. केवलराम काळे आदी.



नाशिक– ठाकरे सेनेचे युवा सेना प्रमुख आदित्य दुसाणे यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– माजी संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, शहराध्यक्ष प्रशांत जाधव, सुनील देसाई, उदय जोशी, दत्ता शिंदे, जितेंद्र चोरडिया, रुपाली नेर, संदीप बनकर, मंगेश नाईक, अतुल धामणे, अतुल चोपडे, रफिक शेख आदी.



देगलूर–बिलोली (जि.नांदेड)– माजी नगरसेवक मैलागिरे यांच्यासह सर्व सहकाऱ्यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती–खा. अशोक चव्हाण, जिल्हाध्यक्ष डॉ.संतुकराव हंबरडे, महानगर जिल्हाध्यक्ष प्रवीण साले, सरचिटणीस विजय गंभीरे, एकनाथ पवार, ज्येष्ठ नेते शिवाजीराव देशमुख–बळेगावकर, मिसाळे गुरूजी, शंकर अण्णा कंतेवार, प्रशांत दासरवाड, ॲड. नाईक, अनिल पाटील–खानापूरकर, चंद्रशेखर पाटील, प्रितम देशमुख, दिपक शहाणे, अशोक साखरे–बिरादार, मनोज जाधव, कामाजी सरोदे, अक्षय अमिलकठंवार आदी.



सेलू–जिंतूर (जि.परभणी)– माजी जि. प. सदस्य रमेश माने, कृषी उत्पन्न बाजार समिती सेलूचे संचालक माऊली राऊत, माजी पं. स. समिती सदस्य सेलू संपतराव राठोड, नबाजीराव खेडेकर, विजय भुजबळ, रमेश शिंदे, बाबासाहेब काकडे, मधुकर सोळंके, अशोकराव खरात यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर आदी.




नागपूर– ब्रह्मपुरी तालुक्यातील काँग्रेस नेते देविदासराव बाणबले यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ज्येष्ठ नेत्या व माजी मंत्री शोभाताई फडणवीस आदी.



ब्रह्मपुरी येथील गौरव भैय्या, नगर परिषद माजी गटनेते विलास विखार, माजी नगर परिषद उपाध्यक्ष डॉ. सतीश कावळे, पं. स. माजी सभापती नामदेव लांजेवार, सुरेश दर्वे, सुखदेव खेने, स्वप्नील सावरकर, मोहन वैद्य यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आ.बंडी भांगडिया आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई–२०
दूरध्वनी : ०२२–२२०२२०५०, फॅक्स : ०२२–२२८५२३०५
ई मेल– bjpmaha.manogat@gmail.com